# महाराष्ट्र राज्य पोलीस कर्तव्य मेळावा

# नियमावली

# अनुक्रमणिका


| अ.नं. | विषय | पान नंबर |
|---|---|---|
| १ | महाराष्ट्र राज्य पोलीस कर्तव्य मेळाव्याची नियमावली - प्रस्तावना | ३ - ५ |
| २ | महाराष्ट्र पोलीस कर्तव्य मेळाव्यातील स्पर्धांचे सर्वसाधारण नियम | ६ - ८ |
| ३ | सायंटीफिक एड टू इन्व्हेस्टीगेशन स्पर्धा | ९ - १४ |
| ४ | सायंटीफिक एड टू इन्व्हेस्टीगेशन स्पर्धा (प्रवेश अर्ज) | १५ |
| ५ | पोलीस फोटोग्राफी स्पर्धा सर्वसाधारण नियम | १६ - १७ |
| ६ | पोलीस फोटोग्राफी स्पर्धा (प्रवेश अर्ज) | १८ |
| ७ | पोलीस व्हिडीओग्राफी स्पर्धा सर्वसाधारण नियम | १९ - २० |
| ८ | पोलीस व्हिडीओग्राफी स्पर्धा (प्रवेश अर्ज) | २१ |
| ९ | माहिती तंत्रज्ञान प्राविण्य स्पर्धा सर्वसाधारण नियम | २२ - ३२ |
| १० | माहिती तंत्रज्ञान प्राविण्य स्पर्धा (प्रवेश अर्ज) | ३३ |
| ११ | ॲन्टी सबोटेज चेक स्पर्धा सर्वसाधारण नियम | ३४ - ३६ |
| १२ | ॲन्टी सबोटेज चेक स्पर्धा (प्रवेश अर्ज) | ३७ |
| १३ | श्वान स्पर्धा सर्वसाधारण नियम | ३८ - ४८ |
| १४ | श्वान पथक स्पर्धा (प्रवेश अर्ज) | ४९ |
| १५ | परिशिष्ट - १<br>महाराष्ट्र राज्य पोलीस कर्तव्य मेळाव्यामध्ये दिल्या जाणाऱ्या चषकांची यादी | ५० |
| १६ | परिशिष्ट - २<br>महाराष्ट्र राज्य पोलीस कर्तव्य मेळाव्यामध्ये दिल्या जाणाऱ्या पदकांची यादी | ५१ |
| १७ | परिशिष्ट -३<br>महाराष्ट्र राज्य पोलीस कर्तव्य मेळावा आयोजित करणेकामी प्रथमत: आयोजन समिती गठित करण्यात येते. | ५२ - ५३ |



# महाराष्ट्र राज्य पोलीस कर्तव्य मेळावा नियमावली

## प्रस्तावना

राष्ट्रीय पातळीवर पोलीस कर्तव्य मेळाव्याचे आयोजन करण्याची संकल्पना मांडली जाण्यापूर्वी, पोलिसांना जिल्हा अथवा राज्य स्तरावर इतर पोलीस बांधवांसोबत आपल्या कामकाजातील अनुभव, नवीन तंत्रज्ञान आणि कल्पनांची देवाणघेवाण करण्यासाठी कोणताही हक्काचा मंच उपलब्ध नव्हता. पोलिसांच्या दैनंदिन कामकाजाच्या पद्धतीत सुधारणा व्हावी, तसेच पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांना एकत्र येऊन विचारांचे आदान - प्रदान करता यावे, या उद्देशाने सन १९५३ मध्ये पहिल्या 'अखिल भारतीय पोलीस कर्तव्य मेळाव्याचे' (AIPDM) आयोजन करण्यात आले. सुरवातीला या मेळाव्यात केवळ रायफल व रिव्हॉल्व्हर शुटींग स्पर्धांचा समावेश होता. परंतु, काळाच्या गरजेनुसार या मेळाव्यातील स्पर्धांचे स्वरूप आणि स्पर्धकांची संख्या सातत्याने वाढत गेली. सद्यस्थितीत या कर्तव्य मेळाव्यात खालील प्रमुख स्पर्धा प्रकारांचा समावेश होतो.

- **सायंटिफिक एड टू इन्व्हेस्टीगेशन** (Scientific Aids to Investigation)
- **पोलीस फोटोग्राफी** (Police Photography)
- **पोलीस व्हिडीओग्राफी** (Police Videography)
- **इनफॉरमेशन टेक्नोलॉजी प्रोफिशियन्सी** (IT Proficiency Competition)
- **अँटी सॅबोटेज चेक स्पर्धा** (Anti-Sabotage Check)
- **श्वान स्पर्धा** (Police Dog Competition)

### महाराष्ट्र राज्य पोलीस कर्तव्य मेळाव्याची सुरुवात

सन २००२ पूर्वी महाराष्ट्र पोलीस दलाच्या संघासाठी राज्य स्तरावर स्वतंत्र कर्तव्य मेळाव्याचे आयोजन केले जात नव्हते. थेट अखिल भारतीय स्तरावर संघ पाठवला जात असल्यामुळे, पुरेशा सरावाअभावी राष्ट्रीय स्तरावर आपल्या संघाला अपेक्षित यश किंवा पदके मिळत नव्हती. हिच उणीव भरून काढण्यासाठी आणि राष्ट्रीय स्तरावर महाराष्ट्र पोलीस दलाची कामगिरी उंचावण्यासाठी, अखिल भारतीय पोलीस कर्तव्य मेळाव्याच्या धर्तीवर **सन २००२ पासून 'महाराष्ट्र राज्य पोलीस कर्तव्य मेळाव्याचे आयोजन करण्यास सुरुवात झाली.**

## आयोजन आणि निवड प्रक्रिया

अपर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषण विभाग (CID), महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या मार्गदर्शनाखाली दरवर्षी या मेळाव्याचे शिस्तबद्ध नियोजन केले जाते.

**महाराष्ट्र राज्य पोलीस कर्तव्य मेळाव्याची निवड प्रक्रिया खालील टप्प्यांत पार पडते:**

१. **परिक्षेत्रिय / आयुक्तालय स्तर:** सर्वप्रथम या स्तरावर कर्तव्य मेळावे घेऊन उत्कृष्ट स्पर्धकांची निवड केली जाते.

२. **राज्य स्तर :** हे निवडलेले संघ 'महाराष्ट्र राज्य पोलीस कर्तव्य मेळाव्यात' सहभाग घेतात.

३. **विशेष सराव शिबीर :** निवड झालेल्या या अंतिम संघाला **राज्य गुप्तवार्ता प्रबोधिनी (MIA), रामटेकडी, पुणे** येथे तज्ज्ञ प्रशिक्षकांद्वारे **४५ दिवसांचे** सखोल व कसून प्रशिक्षण दिले जाते. त्यानंतरच हा संघ राष्ट्रीय स्पर्धेसाठी रवाना होतो.

४. **राष्ट्रीय स्तर (AIPDM):**राज्य स्तरावरील पदक विजेत्या स्पर्धकांमधून 'अखिल भारतीय पोलीस कर्तव्य मेळाव्यासाठी' अंतिम महाराष्ट्र संघाची निवड केली जाते.

## अखिल भारतीय पोलीस कर्तव्य मेळावा: महाराष्ट्र पोलीस संघाची उल्लेखनीय कामगिरी

अखिल भारतीय पोलीस कर्तव्य मेळाव्यात महाराष्ट्र पोलीस संघाने सातत्याने उत्कृष्ट कामगिरी करत राज्याचा गौरव वाढवला आहे. विविध वर्षांतील संघाची वर्षनिहाय कामगिरी खालीलप्रमाणे आहे.

- सन २०१८: महाराष्ट्र पोलीस संघाने स्पर्धेत प्रथम क्रमांक प्राप्त करून मानाची 'चॅम्पियनशिप ट्रॉफी' पटकावली.
- सन २०२३: संघाने उत्कृष्ट कौशल्याचे प्रदर्शन करत एकूण ११ पदकांची कमाई केली आणि देशात द्वितीय क्रमांक मिळवला.
- सन २०२४: संघाने चमकदार कामगिरी करत एकूण ७ पदके जिंकून देशात तृतीय क्रमांक पटकावला.
- सन २०२५: संघाने उल्लेखनीय कामगिरी करत एकूण ४ पदकांची कमाई केली.
- सन २०२६: या मेळाव्यातही महाराष्ट्र पोलीस संघाने आपली यशाची परंपरा कायम राखत एकूण ११ पदकांसह पदक तालिकेत तृतीय स्थान पटकावले.

## प्रोत्साहनपर गौरव:

मेळाव्यात उल्लेखनीय यश संपादन करणाऱ्या विजेत्या स्पर्धकांच्या कौशल्याचा गौरव करण्यासाठी आणि त्यांच्या भविष्यातील कामगिरीस प्रोत्साहन देण्यासाठी त्यांना 'प्रोत्साहनपर बक्षीस' देऊन सन्मानित करण्यात येते.

## शुभेच्छा संदेश

महाराष्ट्र राज्य पोलीस कर्तव्य मेळाव्यात भाग घेणाऱ्या प्रत्येक स्पर्धकाला अखिल भारतीय स्पर्धेचे नियम अचूक माहीत असणे अत्यंत आवश्यक आहे. म्हणूनच, राज्य स्तरावरील तयारीसाठी अत्यंत उपयुक्त व मार्गदर्शक ठरणारी ही **'सुधारित नियमावली'** सादर करताना मला मनापासून आनंद होत आहे.

सर्व घटक प्रमुखांनी या नियमावलीचा सखोल अभ्यास करावा आणि आपल्या घटकातून उत्कृष्ट दर्जाचे अधिकारी व **अंमलदार** निवडून त्यांना राज्य मेळाव्यासाठी प्रोत्साहित करावे, हीच अपेक्षा. स्पर्धकांच्या सुलभ

संदर्भासाठी ही नियमावली गुन्हे अन्वेषण विभागाच्या संकेत स्थळावर देखील उपलब्ध करून देण्यात आली आहे.

या मेळाव्यात सहभागी होणाऱ्या सर्व पोलीस अधिकारी व अंमलदारांना माझ्याकडून हार्दिक शुभेच्छा!

**जय हिंद!**

( **सुनील रामानंद** )
अपर पोलीस महासंचालक,
गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे.

# महाराष्ट्र पोलीस कर्तव्य मेळाव्यातील स्पर्धांचे सर्वसाधारण नियम

१. महाराष्ट्र राज्य पोलीस कर्तव्य मेळावा हा दर वर्षी मा. पोलीस महासंचालक, महाराष्ट्रराज्य, मुंबई यांचे आदेशाने आणि मा. अपर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे अधिपत्याखाली महाराष्ट्रातील निवडलेल्या पोलीस घटकामध्ये आयोजित करण्यात येईल.

२. मा. अपर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी नेमलेल्या आयोजन समिती मार्फत सदर कर्तव्य मेळाव्याचे आयोजन करण्यात येईल.

३. अ) मा. अपर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे हे महाराष्ट्र राज्य पोलीस कर्तव्य मेळाव्याचे ठिकाण व दिनांक याबाबत मा. पोलीस महासंचालक यांचे मान्यतेने निश्चीत करुन सर्व घटकांना कळवतील.

ब) महाराष्ट्र राज्य पोलीस कर्तव्य मेळाव्यामध्ये **एकुण ६ प्रकारच्या स्पर्धा** घेण्यात येतील.

(i) तपासासाठी वैज्ञानिक साहाय्य (Scientific Aids to Investigation)

(ii) पोलीस छायाचित्रण (Police Photography)

(iii) माहिती तंत्रज्ञान प्राविण्य स्पर्धा (IT Proficiency Competition)

(iv) व्हिडिओग्राफी (Videography)

(v) घातपातविरोधी तपासणी (Anti Sabotage Check)

(vi) पोलीस श्वान (Police Dog)

४. **प्रशासकीय अधिकारी:** पोलीस अधीक्षक, कायदा व संशोधन, गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे, हे पोलीस कर्तव्य मेळाव्याचे आयोजन व नियोजनाचे कामकाज पाहतात.

५. **प्रवेश फी:** प्रत्येक सहभागी संघरु पये ५०,०००/- हे प्रवेश फी म्हणुन "महाराष्ट्र स्टेट पोलीस डयूटी मीट फंड" अकाऊंटनंबर- ३१४१९६७०३३५, IFS Code SBIN०००७४५४, Branch Code -००४५४ या वर जमा करतील व ई-मेल आयडी cid.narcotics@gmail.com अथवा ०२०-२५६३८४४३ या फॅक्सवर कार्यालयास कळवतील.

६. **भोजन व निवास:** स्पर्धकांच्या राहण्याची व जेवणाची सोय ही आयोजनाच्या ठिकाणी निश्चित करण्यात आलेल्या कॅम्पमध्ये केली जाईल. भोजन व्यवस्था ही सशुल्क असेल तसेच सर्व संघप्रमुख हे आपल्या संघातील स्पर्धकांचा मेस अग्रीम एकत्रित करुन आणतील. तसेच सर्व संघप्रमुख कॅम्प सोडण्यापुर्वी, मेस संबंधाने झालेल्या खर्चाची पुर्तता करुन नंतरच कॅम्प सोडतील.

७. **कॅम्प नियंत्रण अधिकारी:** कॅम्पमध्ये नियंत्रण अधिकारी म्हणुन, राज्य गुन्हे अन्वेषण विभाग, म.रा., पुणे यांचे कडील, पोलीस उप अधीक्षक दर्जाचे अधिकारी असतील व त्यांना सहाय्य करणेकामी ०२ पोलीस निरीक्षक आणि आवश्यक तेवढे पोलीस अंमलदार यांची नेमणुक केली जाईल. त्यांची कर्तव्ये खालीलप्रमाणे..

I. स्पर्धक अधिकारी / अंमलदार यांची राहण्याची व जेवणाची सोय पाहणे व आजुबाजूच्या परीसराची स्वच्छता ठेवणे.

II. कर्तव्य मेळाव्यासाठी येणारे संघातील स्पर्धकांना रेल्वे स्टेशन अथवा बस स्टॅन्ड या ठिकाणांहून आणण्यासाठी वाहनांची व्यवस्था करुन, त्यांचे निवासस्थानाची व्यवस्था करणे व स्पर्धेनंतर स्पर्धकांना रेल्वे स्टेशन अथवा बस स्टॅन्ड येथे सोडण्याची व्यवस्था करणे.

८. **घटकाचे रिपोर्टींग:** सर्व घटकांचे संघ हे स्पर्धा सुरु होण्याचे एक दिवस अगोदर निश्चित केलेल्या दिनांक वेळेस व ठिकाणी महाराष्ट्र राज्य पोलीस कर्तव्य मेळाव्याकरीता स्थापित नियंत्रण कक्षास रिपोर्ट करतील तसेच सर्व स्पर्धक आपले घटकाचे ओळखपत्र व दोन पासपोर्ट साईजचे फोटो हे न विसरता आपले सोबत आणतील.

९. **गणवेश व उपकरणे:** सर्व स्पर्धक हे स्पर्धे दरम्यान गणवेश परिधान करतील. तसेच स्पर्धेच्या वेळी खांद्या वरील पद - चिन्हे दिसणार नाहीत याबाबत काळजीघेतील. तसेच सर्व स्पर्धक व संघप्रमुख हे आयोजन समिती तर्फे त्यांना देण्यात आलेले ओळखपत्र जवळ बाळगतील. सर्व स्पर्धक आपआपल्या स्पर्धा प्रकारासाठी लागणारे साहित्य/ इन्व्हेस्टिगेशन कीट हे स्वतः बरोबर आणतील.

१०. **संघ प्रमुख:** प्रत्येक संघाचा संघप्रमुख हा राजपत्रित अधिकारी असेल. संघातील सर्व स्पर्धकांवर त्याचे नियंत्रण असेल. तसेच स्पर्धकास कोणत्याही स्पर्धेबाबत आक्षेप घ्यायचा असल्यास, संघ प्रमुख हा संघाच्या वतीने आपला आक्षेप, योग्य ती फी भरुन, पंच व अपील समितीकडे नोंद करतील. संघ प्रमुख हे संघाने जिंकलेल्या चषकांचा संघाच्या वतीने स्विकार करतील सर्व संघप्रमुख हे दररोज सायंकाळी मेळाव्याचे नियंत्रण कक्ष येथे, मिटींगकामी हजर राहतील व तेथे देण्यात येणाऱ्या सुचना या त्यांचे संघातील स्पर्धकांना कळवतील.

११. **चषक:** फिरत्या चषकांव्यतिरिक्त आयोजन समितीकडून प्रत्येक स्पर्धा प्रकारातील विजेत्या स्पर्धकांना प्रथम, व्दितीय, तृतीय स्थानाचे पदक व प्रमाणपत्र देण्यात येईल.

i. स्पर्धेमध्ये भाग घेणा-या स्पर्धकाची पोलीस दलात कमीत कमी 3 महिन्यांची सेवा पुर्ण झालेली असावी.
ii. तसेच स्पर्धक हा त्याने निवडलेल्या स्पर्धा प्रकारामध्ये असलेल्या नियमांच्या निकषास पात्र असावा.
iii. प्रत्येक स्पर्धक हा एकावेळी एकाच स्पर्धा प्रकारात भाग घेऊ शकतो. एकावेळी दोन स्पर्धा प्रकारात भाग घेतल्यास व दोन्ही स्पर्धा एकाच वेळी असल्यास स्पर्धकाला कोणत्याही एकाच स्पर्धेत भाग घेता येईल, त्यांचेसाठी स्पर्धेच्या वेळेत कोणताही बदल करण्यात येणार नाही.
iv. वरीलपैकी कोणत्याही स्पर्धेत मागील तीन वर्षातील अखिल भारतीय पोलीस कर्तव्य मेळाव्यामधील पदक विजेत्यांना सहभाग घेता येणार नाही.

१२. **चषक गुणांकन** – प्रत्येक स्पर्धेची ट्रॉफी कोणत्याही घटकाच्या सहभागी स्पर्धकांनी मिळविलेल्या एकुण संचित गुणांच्या आधारे निश्चित करण्यात येईल. प्रत्येक पदकासाठी गुणांकन खालीलप्रमाणे

- सुवर्णपदक- ५ गुण
- रौप्यपदक- ३ गुण
- कांस्यपदक- १ गुण

१३. **आक्षेप नोंदविणेबाबत:** स्पर्धेदरम्यान एखादया संघ प्रमुखास स्पर्धेच्या नियमांबाबत, निकालाबाबत किंवा कोणत्याही इतर प्रकारचा आक्षेप असल्यास, ते संबंधित घटनेनंतर लगेचच आणि घटना घडल्यापासून दोन तासांच्या आत संघ कर्णधाराने (Team Captain) लेखी स्वरूपात सादर केले पाहिजेत. प्रत्येक आक्षेपासोबत रुपये २,५००/- आक्षेप शुल्क (Protest fee) म्हणून भरणे आवश्यक आहे. पंच हे त्यांच्या अहवालासह स्पर्धकाचा आक्षेप आणि शुल्क अपील ज्युरीकडे पाठवतील, ज्यांचा निर्णय अंतिम असेल.

१४. **अपात्रतेबाबत:** कोणताही स्पर्धक जो एखाद्या स्पर्धेच्या संचालनादरम्यान किंवा त्यातून उद्भवणा-या आक्षेप आणि अपीलांच्या सुनावणी दरम्यान असत्य, चुकीची माहिती देणे किंवा पोलीस अधिकाऱ्याला शोभणार नाही

अशा वर्तनात गुंतलेला आढळल्यास, आयोजन समितीद्वारे त्याला त्या मेळाव्यात किंवा त्यानंतरच्या इतर कोणत्याही मेळाव्यात सहभागी होण्यापासून किंवा पदक मिळवण्यापासून अपात्र ठरवले जाऊ शकते.

१५. **निकाल:** प्रत्येक स्पर्धेचा निकाल हा स्पर्धेनंतर त्याच दिवशी सायंकाळी अथवा दुसरे दिवशी जाहीर करण्यात येईल. सदरचा निकाल हा महाराष्ट्र राज्य पोलीस कर्तव्य मेळाव्याकरीता स्थापित नियंत्रण कक्षातील सूचना पटावर लावण्यात येईल तसेच गुन्हे अन्वेषण विभागाच्या संकेतस्थळावर प्रसारीत करण्यात येईल. निकालाबाबत पंचांचे निर्णय अंतिम राहील.

१६. **परेड:** स्पर्धे दरम्यान दररोज सकाळी व सायंकाळी सर्व संघ प्रमुखांनी त्यांचे संघातील स्पर्धकांना उद्घाटन व समारोपाचे सराव परेडकरिता हजर ठेवणे, ही सर्वस्वी त्यांची जबाबदारी राहील.

१७. **संघाचा ध्वज** : प्रत्येक संघ प्रमुख यांनी त्यांचे आयुक्तालयाचे /परिक्षेत्राचे दोन ध्वज (पैकी एक ध्वज मैदानात लावण्याकरिता ६' x ४' व एक मार्च पासकरीता ३' x २' मापाचा) बरोबर आणावेत.

१८. **पात्रता (Eligibility):**आयोजन समितीने विहित केलेल्या, महाराष्ट्र राज्य पोलीस कर्तव्य मेळाव्यात प्रवेशासाठी अर्ज करण्याच्या अंतिम तारखेला, प्रत्येक स्पर्धकाने नियमित पोलीस दलात पोलीस शिपाई किंवा त्यावरील पदावर किमान तीन महिने सेवा पूर्ण केलेली असावी. वैयक्तिक स्पर्धांच्या नियमांमध्ये नमूद केलेल्या इतर अटींचेही पालन केले जावे.

१९. **व्हिडिओ चित्रीकरण:** महाराष्ट्र राज्य पोलीस कर्तव्य मेळाव्याच्या सर्व स्पर्धांचे (लेखी/मौखिक आणि प्रात्यक्षिक चाचण्यांसह) सर्व कार्यक्रम/स्पर्धांचे व्हिडिओ चित्रीकरण (Videographed) केले जाईल. परंतु अपील कालावधी संपल्यानंतर व्हिडिओ चित्रीकरण जतन केले जाणार नाही याची संबंधित स्पर्धकांनी नोंद घ्यावी.

२०. **टाय ब्रेकर (Tie Breaker):**गुणांची बरोबरी (Tie) झाल्यास, टाय-ब्रेकर चाचणी घेतली जाईल आणि जोपर्यंत टाय ब्रेक होत नाही तोपर्यंत चाचणी घेतली जाईल. त्यानंतरच विजेत्याची घोषणा केली जाईल; टाय ब्रेकर चाचणीच्या योजनेची माहिती 'मॅनेजर्स क्लिनिक'  दरम्यान दिली जाईल.

२१. **चेस्ट नंबर:** महाराष्ट्र राज्य पोलीस कर्तव्य मेळाव्याच्या सर्व स्पर्धांच्या स्पर्धकांना टिम मॅनेजर यांच्या बैठकीनंतर ('मॅनेजर्स क्लिनिक') चिठ्ठ्या टाकून चेस्ट नंबर वितरीत केले जातील, जिथे टिम मॅनेजर स्वतः हजर राहून आपल्या संघातील स्पर्धकांचे चेस्ट नंबर ताब्यात घेतील.

# १. तपासासाठी वैज्ञानिक सहाय्य स्पर्धा

## ( Scientific Aids to Investigation)

या स्पर्धांमध्ये आठ (८) उप-स्पर्धांचा समावेश असेल, ज्यामध्ये प्रत्येक स्पर्धेसाठी कमाल ५० गुण असतील.

१) न्यायसहायक विज्ञान (Forensic Science) - लेखी चाचणी
२) न्यायवैद्यकीय (Medico-Legal) - मौखिक चाचणी
३) गुन्हा तपास, फौजदारी कायदे, नियम व प्रक्रिया आणि न्यायालयीन निर्णय - लेखी चाचणी
४) अंगुलीमुद्रा (Fingerprints) - प्रात्यक्षिक चाचणी
५) संशयिताचे रेखाचित्र/वर्णन (Portrait Parley ) - प्रात्यक्षिक चाचणी
६) निरीक्षण (Observation) - प्रात्यक्षिक चाचणी
७) वस्तू/पुराव्यांचे संकलन आणि पॅकिंग (Lifting and Packing of Exhibits) - प्रात्यक्षिक चाचणी
८) गुन्ह्याच्या ठिकाणाचे छायाचित्रण (Crime Scene Photography) - प्रात्यक्षिक चाचणी

१. **संघ रचना :**परिक्षेत्रे/ आयुक्तालये यांनी या स्पर्धेकरीता पाच स्पर्धकांचा एकच संघ पाठवावा. त्यात पोलीस निरीक्षक – १, सहाय्यक पोलीस निरीक्षक/ पोलीस उप निरीक्षक -२ ,सहाय्यक फौजदार/ पोलीस हवालदार- १, पोलीस शिपाई – १ यांचा समावेश असावा.

   अ. प्रत्येक संघातील ०३ अधिकारी हे उपप्रकार १ ते ६ मध्ये स्वतंत्रपणे भाग घेऊ शकतात. इतर दोन पोलीस अंमलदार हे फक्त ७ व ८ क्रमांकाचे उपप्रकारातच भाग घेतील. (एक अंमलदार हा एकाच स्पर्धेमध्ये सहभागी होईल.)

   **आ**. ज्या संघात ५ पेक्षा कमी स्पर्धक आहेत व त्या संघाने सांघिक कामगिरीत जास्त पदके मिळविली असतील, अशा वेळी संघात ५ पेक्षा कमी स्पर्धक आहेत, या कारणावरुन तो संघ बाद होणार नाही.

   **इ**. संघातील सदस्यांचे नाव हुद्दा, घटकाचे नाव व तो कोणत्या स्पर्धा प्रकारात सहभाग घेणार आहे, या बाबतचा स्पष्ट उल्लेख त्या स्पर्धेच्या प्रवेश अर्जात करण्यात यावा, स्पर्धेच्या प्रवेश अर्जात नमुद करण्यात आलेल्या स्पर्धकांव्यतिरिक्त इतर स्पर्धकास स्पर्धेत सहभागी होता येणार नाही.

२. जिल्हा अंगुली मुद्रा विभागात, अंगुली मुद्रा तज्ञ म्हणून कर्तव्यावर असलेल्या, अधिकारी/अंमलदार यांना, या स्पर्धेत सहभागी होता येणार नाही.

३. एखाद्या स्पर्धकाने अखिल भारतीय पोलीस कर्तव्य मेळाव्यामध्ये सहभागी होऊन सुवर्ण, रजत, कांस्य पदक प्राप्त केले असल्यास त्याला पुढील सलग तीन मेळाव्यांमध्ये या स्पर्धेत भाग घेण्याची परवानगी दिली जाणार नाही.

४. स्पर्धकांचे प्रवेश अर्जावर, आयोजन समितीचे नियमांप्रमाणे स्पर्धकांची स्पर्धेकरिता निवड करण्यात आली असलेबाबत, विशेष पोलीस महानिरीक्षक / पोलीस आयुक्त यांनी स्वाक्षरी करावी.

५. राखीव स्पर्धकांची नावे घटकांनी स्पर्धेपुर्वी सादर करणे आवश्यक आहे; ऐनवेळी कोणालाही स्पर्धकांची नाव बदलण्याची (Substitution) परवानगी दिली जाणार नाही.

६. मागील ५ वर्षातील महाराष्ट्र राज्य पोलीस कर्तव्य मेळावामध्ये सलग सहभाग घेतलेल्या स्पर्धकांची निवड करण्यात येऊ नये.

## १) न्यायसहायक विज्ञान (फॉरेन्सिक सायन्स) लेखी चाचणी (एकूण गुण: ५०)

१. फॉरेन्सिक सायन्सच्या लेखी चाचणीचा पेपर **दोन तासांच्या कालावधीचा** असेल आणि या पेपरसाठी कमाल **५० गुण** असतील.

२. फॉरेन्सिक सायन्सशी संबंधित प्रत्येक विषयामधून (Topic), आवश्यकतेनुसार काही उप-विभागांसह, कमाल ५० बहुपर्यायी प्रश्न (Multiple Choice Questions - MCQs) विचारले जातील. प्रत्येक प्रश्न एका विशिष्ट प्रकारच्या गुन्ह्याच्या तपासावर आधारित असेल. या चाचणीचा उद्देश उमेदवाराची फॉरेन्सिक सायन्सच्या गुन्हे तपासातील उपयोजनाची (Application) समज आणि त्याचे महत्त्व ओळखण्याची क्षमता यांचे मूल्यांकन करणे हा आहे. गुन्ह्यांच्या प्रकारांमध्ये खालील बाबींचा समावेश असू शकतो, परंतु ते केवळ यापुरतेच मर्यादित नाही:

**उदा**.

**अ**) पॅडलॉक्स (टाळे), बॉडी लॉक्स, तिजोऱ्या (Safes), खिडक्या, दरवाजे इत्यादी तोडून केलेल्या घरफोड्या (हत्यारांच्या/साधनांच्या खुणांचे परीक्षण - Examination of tool marks).

**आ**) विषबाधेची संशयास्पद प्रकरणे.

**इ**) मनुष्यवध (Homicide) आणि आत्महत्येचा तपास.

**ई**) अग्निशस्त्रांचा (Firearms) समावेश असलेले गुन्हे.

**उ**) जाळपोळ संबंधीचे गुन्हे.

**ऊ**) संशयास्पद किंवा वादग्रस्त दस्तऐवज (Questioned documents) परीक्षणात छायाचित्रण तंत्राचा (Photographic techniques) वापर, ज्यामध्ये खाडाखोड करणे (Erasures), अक्षरांवर पुन्हा लिहिणे (Overwriting), अदृश्य लेखन (Invisible writings) इत्यादींचा समावेश होतो.

**ऋ**) धडक देऊन पळून जाण्याच्या (Hit-and-run) वाहन अपघातांच्या घटना.

**ऌ**) सायबर गुन्हे आणि सायबर फॉरेन्सिक (Cyber Crimes, Cyber Forensics).

३. तपास अधिकारी म्हणून काम करताना अनेकदा विविध प्रकारच्या भौतिक पुराव्यांशी सामना येतो, जसे की रक्त, वीर्य आणि इतर जैविक डाग, केस, काच, माती, लाकडाचे तुकडे, धागे,कागद, कापड आणि इतर संकीर्ण अवशेष जसे की धूळ, राख इत्यादी या अनुषंगाने अशा साहित्याचे महत्त्व आणि पुराव्यात्मक मूल्य यावर एक किंवा कमाल पाच प्रश्न केंद्रित असू शकतात.

४. या प्रश्नांचा उद्देश स्पर्धकाची अशा पुराव्यांच्या वैज्ञानिक परीक्षणाचे महत्त्व आणि गुन्हे उकल करण्यात मदत करू शकणारे सुगावे मिळवण्याबाबतच्या सामान्य आकलनाची चाचणी घेणे हा असेल.

५. अंगुलीमुद्रा / पायांचे ठसे विज्ञान (Fingerprints/Footprints Science) या पेपरमधून वगळण्यात आले आहे, कारण या विषयावर स्वतंत्र चाचणी घेतली जाते.

## २) न्यायवैद्यकीय (मेडीको लिगल टेस्ट ) तोंडी चाचणी -

१. मेडीको लिगल या विषयाची तोंडी परीक्षा ही एकुण ५० गुणांची असेल.

२. या तोंडी परीक्षेमध्ये गुन्हे तपासाशी संबंधित न्यायवैद्यकीय (Medico-legal) आणि वैज्ञानिक विषयांचा समावेश असेल. परीक्षा सुरू होण्यापूर्वी, स्पर्धकांना स्पर्धेसाठी मांडलेल्या समस्यांचा अभ्यास करण्यासाठी ३० मिनिटांचा वेळ दिला जाईल. त्यांना महत्त्वाचे मुद्दे टिपून घेण्याची परवानगी असेल, परंतु सविस्तर नोट्स काढण्याची परवानगी दिली जाणार नाही.

३. त्यानंतर, प्रेतांचे परीक्षण, दुखापतींचे/जखमांचे परीक्षण, गुन्ह्याच्या ठिकाणाचे परीक्षण,अपघात, वस्तू/पुरावे संकलित करणे आणि ते परीक्षणासाठी पाठवणे यांसारख्या विषयांवर प्रश्न विचारले जातील. प्रश्नांची रचना पंचांच्या विवेकबुद्धीनुसार असेल.

४. प्रत्येक स्पर्धकाला तोंडी परीक्षेसाठी अंदाजे १५ मिनिटांचा वेळ मिळेल.

## ३) गुन्हा तपास, फौजदारी कायदे, नियम व प्रक्रिया आणि न्यायालयीन निर्णय लेखी चाचणी (एकूण गुण:५०)

गुन्हा तपास विषयामध्ये बहुपर्यायी स्वरूपाच्या प्रश्नांचा समावेश असेल, ही चाचणी एकूण ५० गुणांची असून प्रत्येक प्रश्नाला एक गुण असेल. या चाचणीचा कालावधी ०२ तासांचा असून ज्या क्षेत्रांमधून प्रश्न विचारले जातील, ते खालीलप्रमाणे आहेत:

i. **गुन्हे तपास (Crime Investigation) – १५ गुण**

गुन्हेगारी तपासात समाविष्ट असलेली तत्त्वे, प्रक्रिया आणि तंत्रे (Principles, procedures, and techniques).

अ. मनुष्यवधाचा (Homicide) तपास

ब.दरोडा आणि दरोड्याच्या पूर्वतयारीसह प्रयत्न किंवा जबरी चोरी (Dacoity and Robbery)

क.बलात्कार (Rape)

ड. दंगल/हंगाम्याची (Rioting) प्रकरणे इत्यादी.

ii. **फौजदारी कायदे, नियम व प्रक्रिया (Criminal Laws, Rules & Procedures) –**

संबंधित कायदेशीर तरतुदी आणि कायदेशीर प्रक्रिया.

**अ. कायदा (Law) – १५ गुण**

सर्व प्रमुख (Major) आणि गौण/विशेष (Minor) कायदे.

**ब. नियम आणि कार्यवाही/प्रक्रिया (Rules & Proceedings) – १० गुण**

१.एफआयआर (FIR - प्रथम खबरी अहवाल)

२. इनक्वेस्ट (Inquest - मरणोत्तर पंचनामा/चौकशी)

३. टी.आय. परेड (T.I. Parade - ओळख परेड)

४. इंटरोगेशन (Interrogation - आरोपी/संशयितांची उलट तपासणी/चौकशी)

५. सर्च आणि सीझर (Search & Seizure - झडती आणि जप्ती) इत्यादी.

iii. **न्यायालयीन निर्णय (Court Judgements) – १० गुण**

प्रामुख्याने सर्वोच्च न्यायालय (Supreme Court) आणि उच्च न्यायालयांचे (High Courts) निर्णय व नियम. महत्त्वाचे न्यायिक निर्णय आणि त्यांचे कायदा अंमलबजावणीवर (Law enforcement) होणारे परिणाम. स्पर्धकाची गुन्हे तपासाची तत्त्वे, कायदेशीर प्रक्रिया आणि न्यायालयांचे ऐतिहासिक निर्णय या विषयीचे ज्ञान, आकलन आणि उपयोजन क्षमता यांचे मूल्यांकन करण्यासाठी वरील क्षेत्रांमधून प्रश्न तयार केले जातील.

### ४) अंगुलीमुद्रा प्रात्यक्षिक चाचणी (Fingerprints Practical Test) (एकूण गुण: ५०)

४० गुणांच्या प्रात्यक्षिक चाचणीसाठी, आधीपासून तयार केलेले गुन्ह्याचे ठिकाण (Pre-arranged crime scene) उभारले जाईल, ज्यामध्ये दोन किंवा तीन वस्तू असतील आणि त्यावर अदृश्य/गुप्त बोटांचे ठसे (Latent finger impressions) उमटवलेले असतील. या वस्तूंचे स्वरूप असे असेल की, वस्तूच्या पृष्ठभागाच्या प्रकारानुसार हे अदृश्य ठसे स्पष्ट/विकसित (Develop) करण्यासाठी दोन किंवा तीन वेगवेगळ्या पावडर्सचा (Powders) वापर करणे आवश्यक ठरेल. प्रत्येक स्पर्धकाला कमाल २० मिनिटांच्या विहित वेळेत हे अदृश्य ठसे शोधून ते विकसित करण्यास सांगितले जाईल. त्यानंतर पंच विकसित केलेल्या ठशांचे परीक्षण करतील, गुण देतील आणि नंतर पुढील स्पर्धकासाठी ते गुन्ह्याचे ठिकाण नव्याने (पुर्ववत) तयार करतील. बोटांचे ठसे (फिंगरप्रिंट्स) प्रात्यक्षिक चाचणीचाच एक भाग म्हणून १० गुणांची तोंडी परीक्षा (Oral examination) घेतली जाईल.

सदर स्पर्धेकरिता ठसे विकसित करणेसाठी आवश्यक असलेली पावडर ही गुन्हे अन्वेषण विभागाकडून पुरविण्यात येईल.

### ५) संशयिताचे रेखाचित्र/वर्णन प्रात्यक्षिक चाचणी (Portrait Parley Practical Test) - (एकूण गुण: ५०)

या स्पर्धेचा उद्देश स्पर्धकाची निरीक्षण शक्ती, स्मरणशक्ती (Memory recall) आणि थोड्या वेळासाठी पाहिलेल्या व्यक्तींचे अचूक वर्णन करण्याची क्षमता याचे मूल्यांकन करणे हा आहे. स्पर्धकांना अंदाजे १० मिनिटांच्या कालावधीसाठी एक व्यक्ती (संशयित किंवा साक्षीदार) दाखवली जाईल, या वेळेचा अचूक कालावधी मुख्य पंच यांच्या विवेकबुद्धीवर अवलंबून असेल. ठराविक वेळ उलटून गेल्यानंतर, स्पर्धकांना ४५ मिनिटांच्या आत त्या व्यक्तीचे वर्णन इंग्रजीत किंवा त्यांच्या स्वतःच्या भाषेत लेखी स्वरूपात सादर करावे लागेल.

### ६) निरीक्षण प्रात्यक्षिक चाचणी (Observation Practical Test) (एकूण गुण: ५०)

या स्पर्धेचा उद्देश स्पर्धकाची निरीक्षण शक्ती, बारकाव्यांकडे दिलेले लक्ष आणि गुन्हे तपासाशी संबंधित तथ्ये अचूकपणे लक्षात ठेवण्याची व नोंदवण्याची क्षमता याचे मूल्यांकन करणे हा आहे. स्पर्धकांना मर्यादित वेळेसाठी गुन्ह्याच्या ठिकाणाचे छायाचित्र किंवा व्हिडिओ दाखवला जाईल. मुख्य पंच यांनी निश्चित केलेल्या वेळेच्या अंतरानंतर, त्यांना ४५ मिनिटांच्या आत आपले निरीक्षण लेखी स्वरूपात नोंदवणे आवश्यक असेल.

### ७) वस्तू/पुराव्यांचे संकलन आणि पॅकिंग प्रात्यक्षिक चाचणी (Lifting and Packing of Exhibits Practical Test) (एकूण गुण: ५०)

सदर परीक्षेसाठी एकूण १ तासाचा कालावधी देण्यात येईल. यात १५ गुण ऑब्झर्वेशनसाठी, १५ गुण लिफ्टींग व पॅकींगसाठी, व २० गुण फॉरवर्डींग लेटरसाठी असतील. पुरावाजन्य वस्तुमध्ये २ ते ३ वस्तु ठेवण्यात येतील.

या चाचणीमध्ये गुन्ह्याचे ठिकाण उभारले जाईल, ज्यामध्ये दोन किंवा तीन भौतिक वस्तू/पुरावे असतील. उमेदवारांनी प्रमाणित कार्यपद्धतीनुसार या वस्तू हाताळणे, पॅक करणे,सीलबंद करणे आणि त्यांच्यावर लेबल लावणे आवश्यक आहे. तसेच वस्तूंसोबत पाठवण्यासाठी एक 'फॉरवर्डिंग नोट' तयार करावी लागेल, ज्यामध्ये संबंधित तज्ञांकडून घ्यावयाचे विशिष्ट मत किंवा स्पष्टीकरण स्पष्ट करणारी एक प्रश्नावली समाविष्ट असावी.

**८) गुन्ह्याच्या ठिकाणाचे छायाचित्रण प्रात्यक्षिक परीक्षा (Crime Scene Photography Practical Test) (एकूण गुण: ५०)**

i) स्पर्धक हा नियमित पोलीस छायाचित्रकार (Police photographer) म्हणून कार्यरत असणाऱ्यांपैकी नसावा आणि भूतकाळातही त्याने असे काम केलेले नसावे. उपनिरीक्षक (S.I.) आणि त्यावरील दर्जाचे अधिकारी या स्पर्धेसाठी पात्र असतील.

ii) या स्पर्धेचा विषय अपघातासारखे बाहेरील गुन्ह्याचे ठिकाण (Outdoor scene of crime), खून किंवा फौजदारी खटल्यात पुराव्यात्मक मूल्य असलेले इतर कोणतेही गुन्ह्याचे ठिकाण असा असेल. गुन्ह्याचे ठिकाण दरवर्षी बदलले जाईल.

iii) **कॅमेरा (Camera):** गुन्ह्याचे दृश्य टिपण्यासाठी कमाल २०x ऑप्टिकल झूम (Optical zoom) असलेला डिजिटल कॅमेरा (काढता न येणारी लेन्स असलेला कॉम्पॅक्ट कॅमेरा, मेमरी चिप/CF/SD कार्डसह) वापरण्याची परवानगी आहे. स्पर्धकाने किंवा त्याच्या विभागाने स्वतःचा कॅमेरा आणि कार्ड्स इत्यादींची व्यवस्था करावी, कारण आयोजकांकडून ते पुरवले जाणार नाही.

iv) **कार्यपद्धती (Procedure):** सलग सहा (६) फोटो (Shots) काढले जातील, ज्यापैकी सहावा फोटो केवळ स्पर्धकाच्या चेस्ट नंबरचा (Chest no.) असेल. कोणताही जादा फोटो काढण्याची किंवा फोटो डिलीट करण्याची परवानगी दिली जाणार नाही. मेमरी चिप/CF/SD कार्ड स्पर्धक स्वतः बाहेर काढतील आणि मूल्यांकनासाठी मुख्य पंच यांचेकडे सुपूर्द करतील. मेमरी चिप/CF/SD कार्ड इत्यादी कोणत्याही परिस्थितीत स्पर्धकाला परत केले जाणार नाही. गुन्ह्याच्या ठिकाणाचा अभ्यास करण्यासाठी प्रत्येक स्पर्धकाला ०५ मिनिटे आणि गुन्ह्याच्या ठिकाणाचे सहा फोटो काढण्यासाठी १० मिनिटे दिली जातील.

v) स्पर्धकांनी अतिरिक्त फ्लड लाईट इत्यादी सारख्या लाईट वापरु नयेत.

२. **परिक्षक समिती**–

सायंटीफिक एड टु इन्व्हेस्टीगेशन या स्पर्धा प्रकारासाठी पोलीस अधीक्षक दर्जाचे एक अधिकारी हे समिती प्रमुख म्हणून काम पाहतील व स्पर्धा प्रकारानुसार परीक्षकांच्या एक अथवा त्यापेक्षा जास्त समित्या असतील त्यांचे कामकाज खालीलप्रमाणे -

- **लेखी परीक्षा** – या परिक्षेकामी त्या त्या स्पर्धा प्रकाराचे समिती प्रमुख हे न्यायसहाय्यक वैज्ञानिक प्रयोग शाळेकडील तज्ञ अधिकारी, तज्ञ विधी अधिकारी व शासकीय रुग्णालयाचे वैदयकीय अधिकारी, यांचे मदतीने लेखी परिक्षेकामी प्रश्न संचाचे व सदर प्रश्नांचे उत्तराचे संच तयार करणे व परीक्षा संपल्यावर सदरच्या उत्तरपत्रिका तपासणी करुन निकाल जाहीर करणे, इत्यादी कामे पहातील.
- **तोंडी परीक्षा** – या सदर परिक्षेकामी स्पर्धा प्रकाराचे समिती प्रमुख हे, न्यायसहाय्यक वैज्ञानिक प्रयोग शाळेकडील तज्ञ अधिकारी, तज्ञ विधी अधिकारी व शासकीय रुग्णालयाचे वैदयकीय अधिकारी यांचे मदतीने तोंडी परिक्षेसाठी प्रश्न संच व उत्तराचे संच तयार करतील व त्या प्रश्नांचे अनुषंगाने परीक्षा घेवुन, त्यानंतर स्पर्धेचा निकाल जाहिर करणे इत्यादी कामे पहातील.
- **प्रात्यक्षिक परीक्षा-**
  a) अंगुली मुद्रा विभाग, गुअवि पुणे यांचेकडील दोन तज्ञ हे फिंगरप्रिंट या विषयासाठी समिती प्रमुख यांना सहाय्यक परिक्षक म्हणुन काम पहातील.
  b) पोलीस पोर्ट्रेट, ऑब्झर्वेशन व लिफ्टींग, पॅकींग ॲन्ड लेबलिंग या स्पर्धा प्रकारासाठी सदर स्पर्धेचे प्रमुख व अंगुलीमुद्रा विभाग गुअवि पुणे यांचेकडील दोन तज्ञ अधिकारी हे परिक्षक म्हणुन कामकाज पहातील.

c) क्राईम सीन फोटोग्राफीकरीता छायाचित्रण विभाग, गुन्हे अन्वेषण विभाग, पुणे दोन तज्ञ अधिकारी हे परिक्षक म्हणुन कामकाज पहातील.

३. **चषक व पदके** –

१. या स्पर्धेत जो संघ सर्वात जास्त गुण प्राप्त करेल त्या संघास, विजेत्या संघासाठी असणारा फिरता चषक प्रदान करण्यात येईल.
२. वैयक्तिक कामगिरीसाठी प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकावर येणारे स्पर्धकांना अनुक्रमे सुवर्ण, रजत व कांस्य पदके व प्रमाणपत्रे देण्यात येतील.
३. या स्पर्धेतील स्पर्धा प्रकारांसाठी देण्यात येणाऱ्या चषक व पदकांची यादी परिशिष्ट -१ व परिशिष्ट - २ येथे नमुद आहे.

# सायंटीफिक एड टू इन्व्हेस्टीगेशन स्पर्धा

## (प्रवेश अर्ज)

१. संघाचे नाव :________________________________________________

२. संघाचे प्रभारी अधिकारी यांचे नाव: ___________________________________

| अनुक्रमांक | स्पर्धकाचे नाव | पद आणि बक्कल क्रमांक |
|---|---|---|
| १. | | |
| २. | | |
| ३. | | |
| ४. | | |
| ५. | | |

**प्रमाणित करण्यात येते की :**

१. वर नमुद केलेले पोलीस निरीक्षक, सहाय्यक पोलीस निरीक्षक, पोलीस उप-निरीक्षक यांनी त्यांच्या सेवा काळात कधीही 'राज्य फिंगरप्रिंट ब्युरो' मध्ये तज्ञ म्हणून काम केलेले नाही.

२. वर नमुद केलेल्या सर्व स्पर्धकांनी स्पर्धेच्या तारखेला पोलीस विभागामध्ये तीन महिन्यांपेक्षा जास्त काळ सेवा पूर्ण केलेली आहे.

३. वरील स्पर्धकांपैकी कोणीही यापूर्वीच्या मागील तीन 'अखिल भारतीय पोलीस कर्तव्य मेळाव्यामध्ये प्रथम, द्वितीय किंवा तृतीय स्थान मिळवलेले नाही.

४. वरील सर्व स्पर्धकांचे प्रवेश शुल्क महाराष्ट्र पोलीस कर्तव्य मेळाव्याच्या फंडात जमा करण्यात आले आहे.

**सही**

**पो. आयुक्त/ विपोमनि.**

# २. पोलीस छायाचित्रण स्पर्धा

**एकूण ५० गुण**

१. ही स्पर्धा पोलीस छायाचित्रकारांसह सर्व पोलीस अधिकाऱ्यांसाठी खुली आहे, जे त्यांच्या विभागाकडून त्यांना देण्यात आलेले अधिकृत कॅमेरे वापरू शकतात.

२. स्पर्धकांनी स्वतःचे कॅमेरे व त्यासाठी लागणारी आवश्यक ती उपकरणे आणावीत. आयोजकांकडून कोणतीही सोय केली जाणार नाही.

३. घटक प्रमुखांनी या स्पर्धेत भाग घेण्यासाठी कमाल दोन (२ पेक्षा जास्त नाही) प्रतिनिधी पाठवू शकतात.

४. एखाद्या स्पर्धकाने अखिल भारतीय पोलीस कर्तव्य मेळाव्यामध्ये सहभागी होऊन सुवर्ण, रजत, कांस्य पदक प्राप्त केले असल्यास त्याला पुढील सलग तीन मेळाव्यांमध्ये या स्पर्धेत भाग घेण्याची परवानगी दिली जाणार नाही.

५. मागील ५ वर्षातील महाराष्ट्र राज्य पोलीस कर्तव्य मेळावामध्ये सलग सहभाग घेतलेल्या स्पर्धकांची निवड करण्यात येऊ नये.

६. स्पर्धा बंद खोलीत अथवा मोकळया जागेत घेण्यात येईल. त्यात गुन्हयाचा देखावा, वाहन अपघात किंवा कोणताही वस्तुजन्य पुरावा असलेला देखावा उभारुन त्या देखाव्यावर आधारित स्पर्धा घेण्यात येईल.

७. या गटातील स्पर्धेचा विषय अंतर्गत (Indoor) किंवा बाह्य (Outdoor) गुन्ह्यांचे ठिकाण असा असेल; जसे की वाहतूक किंवा इतर अपघात, खून किंवा फौजदारी खटल्यात पुराव्यात्मक मूल्य असलेले इतर कोणतेही गुन्ह्याचे ठिकाण दरवर्षी बदलले जाईल आणि त्यामध्ये एक छोटा सुगावा/पुरावा (Clue) समाविष्ट केला जाईल, जेणेकरून स्पर्धकांना 'क्लोज-अप छायाचित्रण' करण्यामधील आपले कौशल्य दाखवता येईल. या स्पर्धेसाठी एकूण ५० गुण असतील (ज्यामध्ये तोंडी परीक्षा/बहुपर्यायी प्रश्नांवर आधारित चाचणीचा समावेश असेल).स्पर्धकांचे प्रवेश अर्जावर, आयोजन समितीचे नियमांप्रमाणे स्पर्धकांची स्पर्धेकरिता निवड करण्यात आली असलेबाबत, विशेष पोलीस महानिरीक्षक/ पोलीस आयुक्तयांनी स्वाक्षरी करावी.

८. **कॅमेरा -** स्पर्धकांना स्पर्धेसाठी डिजीटल SLR कॅमेरा किंवा कोणताही डिजीटल कॅमेरा वापरण्याची परवानगी असून सदरचा कॅमेरा त्यांनी स्वत: आणणे आवश्यक आहे. आयोजकांकडून कोणतीही सोय केली जाणार नाही.

९. **कार्यपद्धती (Procedure) :**

- केवळ चार (४) सलग फोटो काढले जातील. कोणताही जादा फोटो काढण्याची किंवा फोटो डिलीट करण्याची परवानगी दिली जाणार नाही. गुन्ह्याच्या ठिकाणाचा अभ्यास करण्यासाठी प्रत्येक स्पर्धकाला पाच मिनिटे आणि गुन्ह्याच्या ठिकाणाचे ४ फोटो काढण्यासाठी १० मिनिटे दिली जातील. प्रत्येक फोटोमध्ये स्पर्धकांनी त्यांना दिलेला चेस्टनंबर फोटोमध्ये येईल याची दक्षता घ्यावी.

- मेमरी चिप / CF / SD कार्ड कॅमेऱ्यामधून स्पर्धकाने स्वतः बाहेर काढले पाहिजे. स्पर्धकाने स्वतः पंचांसमोर पीसी / प्रिंटरच्या (PC / Printer) साहाय्याने (परिस्थितीनुसार पंच यांनी निश्चित केलेल्या वेळेच्या मर्यादेत) स्वतःचे प्रिंट्स तयार करावेत आणि ते पंच यांच्याकडे सुपूर्द करावेत.

- त्यानंतर त्यातील मेमरी चीफ /सीएफ कार्डातील कोणताही फोटो डिलीट न करता त्याचे प्रिंटस संगणकावर लोड करुन परीक्षकांना दाखवतील.

- फोटो सोबत सादर करण्यात येणाऱ्या स्लिपवर खालील माहिती असावी.

  - नाव :-

- संघाचे नाव :-
- कॅमेऱ्याची बनावट व कंपनी:-
- एक्सपोजर :-लेन्सस्टॉप ----- शटरस्पिड -----
- फिल्म ----- फिल्टर ----- पेपर -----

- परीक्षेचा निकाल जाहीर झाल्यावर स्पर्धकांना त्यांचे मेमरी कार्ड परत दिले जाणार नाही.
- दृश्यांचे छायाचित्रण करण्यासाठी फ्लॅश लाईट्स (Flash lights), ट्रायपॉड स्टँड (Tripod stand) आणि फिल्टर्स (Filters) वापरण्याची परवानगी असेल. कोणत्याही अतिरिक्त फ्लड लाइटिंगला (Supplementary Flood lighting - पूरक प्रकाश योजना) परवानगी दिली जाणार नाही.
- स्पर्धेच्या विषयाबाबतचा सविस्तर तपशील स्पर्धा सुरू होण्यापूर्वी पंच यांच्याद्वारे स्पर्धकांना निर्देशित केला जाईल.
- छायाचित्राच्या मालकी हक्काबाबत कोणताही संशय टाळण्यासाठी, प्रत्येक स्पर्धकाला एक ओळख क्रमांक कार्ड दिले जाईल, ज्याचा प्रत्येक एक्सपोजरमध्ये (प्रत्येक फोटोमध्ये) फोटो काढणे अनिवार्य आहे. संदिग्धता टाळण्याकरिता प्रत्येक चित्रीकरणामध्ये स्पर्धकांनी, त्यांना दिलेला चेस्ट नंबर चित्रीकरणात येईल याची दक्षता घ्यावी.
- स्पर्धा संपल्यानंतर स्पर्धकाने कॅमेऱ्यातील मेमरी कार्ड काढून त्यावर आपला चेस्टनंबर नोंदवून ते पंचांकडे सोपवावे.
- सामान्य छायाचित्रणावर आधारित १० गुणांची तोंडी परीक्षा / बहुपर्यायी प्रश्नांवर आधारित चाचणी घेतली जाईल. स्पर्धकांना छायाचित्रणाचे केवळ प्रात्यक्षिकच नाही तर महत्त्वाचे सैद्धांतिक पैलू देखील माहित असणे आवश्यक आहे. उदाहरणार्थ - आयएसओ, शटर स्पीड, अपर्चर आणि प्रकाश परिस्थितीतील बदलानुसार एक्स्पोजर कसे निश्चित करावे, हे त्यांना माहित असणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे, पोलीस छायाचित्रणाच्या क्षेत्रात येणाऱ्या विविध प्रकारच्या छायाचित्रणासाठी कोणत्या प्रकारचे साहित्य आणि उपकरणे वापरावीत, याबद्दल त्यांना पुरेशी माहिती असणे आवश्यक आहे. फॉरेन्सिक (न्यायसहायक) कामामध्ये क्लोज-अप छायाचित्रण अत्यंत आवश्यक आहे.
- सदर स्पर्धेसाठी गुणांची वर्गवारी पुढीलप्रमाणे-

| | |
|---|---|
| अ. निरीक्षण कौशल्य | - ५ गुण |
| ब.घटनास्थळाचे वर्णन | - ५ गुण |
| क.शव किंवा मृतदेह ओळखणे | - ५ गुण |
| ड.सर्व पुरावे | - १० गुण |
| इ. चान्स प्रिंट / ठसे | - १५ गुण |
| फ. छायाचित्राची गुणवत्ता | - ५ गुण |
| ग. तोंडी परीक्षा | - ५ गुण |
| | -------------------------------- |
| | एकूण - ५० गुण |

१०. पदक आणि चषक -

- वैयक्तिक कामगिरीसाठी प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकावर येणारे स्पर्धकांना अनुक्रमे सुवर्ण, रजत व कांस्य पदके व प्रमाणपत्रे देण्यात येतील.
- विजेत्या संघासाठी फिरता चषक प्रदान करण्यात येईल.

११. **परिक्षक -** या स्पर्धेसाठी स्पर्धा समितीचे प्रमुख व इतर शासकीय/निमशासकीय / महाविदयालयातील फोटोग्राफी विषयातील दोन तज्ञ अधिकारी **हे** परिक्षक म्हणुन काम पहातील ज्यांचा सर्व बाबींमधील निर्णय अंतिम असेल.

# पोलीस छायाचित्रण स्पर्धा

## (प्रवेश अर्ज)

१. संघाचे नाव :______________________________________________

२. संघाचे प्रभारी अधिकारी यांचे नाव: ______________________________

| **अनुक्रमांक** | **स्पर्धकाचे नाव** | **पद आणि बक्कल क्रमांक** |
|---|---|---|
| १. | | |
| २. | | |

**प्रमाणित करण्यात येते की :**

१. वर नमुद केलेल्या दोन स्पर्धकांनी पोलीस विभागात तीन महिन्यांपेक्षा जास्त काळ सेवा पूर्ण केली आहे.

२. वरील स्पर्धकांपैकी कोणीही यापूर्वीच्या मागील तीन अखिल भारतीय पोलीस कर्तव्य मेळाव्यामध्ये प्रथम, द्वितीय किंवा तृतीय स्थान मिळवलेले नाही.

३. वरील स्पर्धकांचे प्रवेश शुल्क महाराष्ट्र पोलीस कर्तव्य मेळाव्याच्या फंडात जमा करण्यात आले आहे.

**सही**

**पो. आयुक्त/ विपोमनि.**

# ३. पोलीस व्हिडिओग्राफी स्पर्धा

१. ही स्पर्धा पोलीस छायाचित्रकार / व्हिडिओग्राफरसह सर्व पोलीस अधिकाऱ्यांसाठी खुली आहे, जे त्यांच्या विभागाकडून त्यांना देण्यात आलेले अधिकृत कॅमेरे वापरू शकतात.

२. स्पर्धकांनी स्वतःचे कॅमेरे व त्यासाठी लागणारी आवश्यक ती उपकरणे आणावीत. आयोजकांकडून कोणतीही सोय केली जाणार नाही.

३. घटक प्रमुखांनी या स्पर्धेत भाग घेण्यासाठी कमाल दोन (२ पेक्षा जास्त नाही) प्रतिनिधी पाठवू शकतात.

४. एखाद्या स्पर्धकाने अखिल भारतीय पोलीस कर्तव्य मेळाव्यामध्ये सहभागी होऊन सुवर्ण, रजत, कांस्य पदक प्राप्त केले असल्यास त्याला पुढील सलग तीन मेळाव्यांमध्ये या स्पर्धेत भाग घेण्याची परवानगी दिली जाणार नाही.

५. मागील ५ वर्षातील महाराष्ट्र राज्य पोलीस कर्तव्य मेळावामध्ये सलग सहभाग घेतलेल्या स्पर्धकांची निवड करण्यात येऊ नये.

६. या गटातील स्पर्धेचा विषय पुराव्यात्मक मूल्य असलेले बाह्य दृश्य / घटना असा असेल. ही स्पर्धा पोलीस कर्तव्याशी संबंधित कोणत्याही कार्यात्मक आवश्यकतांवर आधारित असेल, जसे की कायदा व सुव्यवस्था, गर्दी नियंत्रण, व्हीआयपी सुरक्षा/ स्थलांतर, सार्वजनिक सभा/ कार्यक्रम, सुरक्षा व्यवस्था, वाहतूक, स्फोटाच्या घटना, गुन्ह्याच्या ठिकाणाची नोंद, सत्कार समारंभ, कल्याणकारी कार्यक्रम आणि पोलीस क्रीडा स्पर्धा इत्यादी.

७. **मूल्यमापन / गुणदान पद्धती (एकूण १०० गुण) :** गुणदान हे स्पर्धकाचे निरीक्षण कौशल्य, संपूर्ण दृश्याचे वर्णन, महत्त्वाच्या घडामोडींचे/ कृतींचे क्लोज-अप दृश्य , महत्त्वाच्या खुणा, गुन्हेगार आणि बळी पडलेल्या व्यक्तींचे ओळख, तपशील, घटनेचे ठिकाण, महत्त्वाचे सुगावे, व्हिडिओ उपकरणे हाताळण्याची क्षमता आणि व्हिडिओची एकूण गुणवत्ता यावर आधारित असेल.

   **i.** **कॅमेरा:** मेमरी चिप/SD कार्ड/ CF कार्ड इत्यादी काढता येण्याजोगे रेकॉर्डिंग मीडिया असलेला कोणताही डिजिटल व्हिडिओ कॅमेरा / कॅमकॉर्डर (Camcorder) वापरण्यास परवानगी आहे. अंगभूत (Built-in) हार्ड डिस्क असलेला डिजिटल व्हिडिओ कॅमेरा वापरण्यास परवानगी दिली जाणार नाही. स्पर्धकांनी स्वतःचे कॅमेरे / कॅमकॉर्डर त्यासाठी लागणारी आवश्यक ती उपकरणे आणावीत. आयोजकांकडून कोणतीही सोय केली जाणार नाही.

   **ii.** **कार्यपद्धती:** छायाचित्राच्या / व्हिडिओच्या मालकी हक्काबाबत कोणताही संशय टाळण्यासाठी, प्रत्येक स्पर्धकाला कॅमेरा तपासण्यासाठी आणि त्याचे ओळखपत्र (चेस्ट नंबर) रेकॉर्ड करण्यासाठी ६० ते १२० सेकंद (१-२ मिनिटे) दिले जातील. हे पंचांच्या उपस्थितीत केले जाईल. स्पर्धकाने कॅमेरा पंचांकडे दिल्यानंतर त्याला घटनेच्या दृश्याचा अभ्यास करण्यासाठी दोन मिनिटे दिली जातील. त्यानंतर घटना/ कृती रेकॉर्ड करण्यासाठी ५ ते १० मिनिटे (दृश्यानुसार) दिली जातील. व्हिडिओग्राफी स्पष्ट ऑडिओसह एकाच क्लिपच्या स्वरूपात असणे आवश्यक आहे. व्हिडिओग्राफीमध्ये घटनेच्या तारखे व्यतिरिक्त, घडल्याचे ठिकाण, विशेष वैशिष्ट्ये आणि पुराव्यात्मक मूल्य असलेले महत्त्वाचे सुगावे यांचे पूर्ण वर्णन असले पाहिजे. व्हिडिओग्राफी करायच्या दृश्याला कोणत्याही स्पर्धकाने स्पर्श करू नये. दिलेली वेळ संपल्यानंतर, स्पर्धकाने कॅमेऱ्यातून स्टोरेज डिव्हाइस (मेमरी कार्ड) काढून त्यावर आपला चेस्ट नंबर नोंदवून ते पंचांकडे सोपवावे.

      १. प्रत्येक चित्रीकरणामध्ये स्पर्धकांनी, त्यांना दिलेला चेस्ट नंबर चित्रीकरणात येईल याची दक्षता घ्यावी.

२. स्पर्धकांचे प्रवेश अर्जावर, आयोजन समितीचे नियमांप्रमाणे स्पर्धकांची स्पर्धेकरिता निवड करण्यात आली असलेबाबत, विशेष पोलीस महानिरीक्षक/ पोलीस आयुक्त यांनी स्वाक्षरी करावी

३. स्पर्धेचा निकाल जाहीर झाल्यावर, स्पर्धकांचे मेमरी कार्ड कोणत्याही परिस्थीत परत दिले जाणार नाही. याची स्पर्धकांनी नोंद घ्यावी.

४. व्हिडिओग्राफीचे दृश्य दरवर्षी बदलले जाईल आणि त्यामध्ये छोटे सुगावे समाविष्ट केले जातील जेणेकरून स्पर्धक आपले कौशल्य दाखवू शकतील.

५. **गुण** – सदर स्पर्धेसाठी गुणांची वर्गवारी पुढीलप्रमाणे

| | |
|---|---|
| अ. निरिक्षण कौशल्य | - १० गुण |
| ब. घटनेचे दोन कोनांतून चित्रीत केलेले वर्णन वाहनाचे नंबर प्लेटइ. | - २० गुण |
| क. घटनेचे सर्वसाधारण चित्रीकरण | - १० गुण |
| ड. जवळून केलेले चित्रीकरण | - १० गुण |
| इ. महत्वाचे दुवे / त्यांचे वर्णन | - ३० गुण |
| फ. कॅमेरा हाताळण्याचे कौशल्य | - १० गुण |
| ग. सर्वसाधारण दर्जा | - १० गुण |
| एकूण | - १०० गुण |

८. **पदक आणि चषक** –

- प्रथम वैयक्तिक कामगिरीसाठी प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकावर येणारे स्पर्धकांना अनुक्रमे सुवर्ण, रजत व कांस्य पदके व प्रमाणपत्रे देण्यात येतील.
- विजेत्या संघासाठी फिरता चषक प्रदान करण्यात येईल.

९. **परिक्षक** – या स्पर्धेसाठी या स्पर्धा समितीचे प्रमुख व इतर शासकीय निमशासकीय / महाविद्यालये येथील फोटोग्राफी / व्हिडिओग्राफी विषयातील दोन तज्ञ हे परिक्षक म्हणून काम पहातील. ज्यांचा सर्व बाबींमधील निर्णय अंतिम असेल.

# पोलीस व्हिडिओग्राफी स्पर्धा

## (प्रवेश अर्ज)

१.संघाचे नाव :______________________________________________

२.संघाचे प्रभारी अधिकारी यांचे नाव:______________________________

| अनुक्रमांक | स्पर्धकाचे नाव | पद आणि बक्कल क्रमांक |
|---|---|---|
| १. | | |
| २. | | |

**प्रमाणित करण्यात येते की :**

१. वर नमुद केलेल्या दोन स्पर्धकांनी पोलीस विभागात तीन महिन्यांपेक्षा जास्त काळ सेवा पूर्ण केली आहे.

२. वरील स्पर्धकांपैकी कोणीही यापूर्वीच्या मागील तीन' अखिल भारतीय पोलीस कर्तव्य मेळाव्यामध्ये प्रथम, द्वितीय किंवा तृतीय स्थान मिळवलेले नाही.

३. वरील स्पर्धकांचे प्रवेश शुल्क महाराष्ट्र पोलीस कर्तव्य मेळाव्याच्या फंडात जमा करण्यात आले आहे.

**सही**

**पो. आयुक्त/ विपोमनि.**

# ४. माहिती तंत्रज्ञान प्राविण्य स्पर्धा

## (Information Technology Proficiency Competition)

**उद्दिष्ट :** या स्पर्धेचा उद्देश पोलीस अधिकारी व अंमलदारांमध्ये संगणकाविषयी जागरूकता निर्माण करणे, संगणकीय संस्कृती विकसित करणे, कार्यालयीन कामकाजाचे संगणकीकरण (Office Automation) करणेकरिता प्रोत्साहित करणे तसेच आरोग्यदायी स्पर्धेच्या माध्यमातून विद्यमान प्रतिभेची ओळख करून तिला प्रोत्साहन देणे हा आहे.

**१. स्पर्धेची व्याप्ती -** स्पर्धेची व्याप्ती पुढीलप्रमाणे आहे :-

*** स्पर्धा क्रमांक I (इवेन्ट I) – संगणक तंत्रज्ञानातील मूलभूत व अद्यावत प्रवाह (Fundamental & Latest Trends in Computer Technology)** संगणकाविषयी जागरूकता तसेच माहिती तंत्रज्ञानाच्या मूलभूत ज्ञानाची चाचणी वस्तुनिष्ठ प्रश्नांच्या स्वरूपात घेण्यात येईल.

*** स्पर्धा क्रमांक II (इवेन्ट II) – कार्यालयीन स्वयंचलन (Office Automation)**

या स्पर्धेमध्ये कार्यालयीन स्वयंचलन संदर्भातील पुढील बाबींची चाचणी घेण्यात येईल :

MS-Word मध्ये मजकूर टंकलेखन वेग (अचूकता व विशेष वैशिष्ट्यांचा वापर तपासण्यासाठी) MS-Excel मध्ये तक्ते तयार करणे, विविध प्रकारचे आलेख तयार करणे. उदा .Pie Chart, Histogram, Bar Chart, Line Chart इत्यादी.

दस्तऐवजांचे मुद्रण (Printing).

MS-Power Point चा वापर ज्यामध्ये Slide Master, Animation, Smart Art, Hyperlink, Navigation, Slide Transition, Slide Duration तसेच Macro चा वापर यांचा समावेश असेल.

*** स्पर्धा क्रमांक III (इवेन्ट III) – सॉफ्टवेअर विकास क्षमता (Software Development Capability)**

स्पर्धकांच्या संगणक प्रोग्रामिंग व सॉफ्टवेअर विकास क्षमतेची चाचणी घेण्यासाठी तांत्रिक परीक्षा आयोजित करण्यात येईल.

*** स्पर्धा क्रमांक IV (इवेन्ट IV) – उत्कृष्ट माहिती तंत्रज्ञान प्रकल्प (Champion IT Project)**

ही स्पर्धा इतर तीन स्पर्धांप्रमाणे महाराष्ट्र पोलीस कर्तव्य मेळाव्यादरम्यान आयोजित करण्यात येणार नाही.

राज्ये व केंद्रशासित प्रदेशांसाठी CCTNS चा अधिकाधिक व प्रभावी लाभ मिळविण्यासाठी राबविण्यात आलेल्या माहिती तंत्रज्ञान प्रकल्पांचा या स्पर्धेमध्ये समावेश असेल .CAPFs साठी कोणताही उपयुक्त माहिती तंत्रज्ञान प्रकल्प सादर करता येईल. यापूर्वी या स्पर्धेसाठी सादर करण्यात आलेले प्रकल्प, त्यामध्ये लक्षणीय सुधारणा अथवा अद्यावत बदल करण्यात आले असल्याशिवाय, पुन्हा सादर करण्यास पात्र राहणार नाहीत.

प्रत्येक संस्था संघटनेमध्ये माहिती तंत्रज्ञान अनुप्रयोगांच्या विकास व अंमलबजावणीसाठी सक्षम मूलभूत तांत्रिक गट विकसित करणे आणि बाह्य/आऊटसोर्स संस्थावरील अवलंबित्व कमी करणे, या उद्देशाने ही स्पर्धा सुरू करण्यात आली आहे.

**२. स्पर्धा आयोजनाची पद्धत :-**

- स्पर्धा क्रमांक I व II या वैयक्तिक स्वरूपात आयोजित करण्यात येतील.
- स्पर्धा क्रमांक III ही सांघिक स्वरूपाची स्पर्धा असेल.

- वैयक्तिक स्पर्धांमध्ये प्राप्त गुण एकत्रित करून संघाचे एकूण गुण निश्चित करण्यात येतील.
- NCRB चे महासंचालक यांच्यामार्फत नामनिर्देशित निवड समिती स्पर्धा क्रमांक IV साठी सादर करण्यात आलेल्या माहिती तंत्रज्ञान प्रकल्पांच्या संक्षिप्त विवरणाचे परीक्षण करून प्रात्यक्षिकासाठी प्रकल्पांची निवड करेल.
- निवड झालेल्या माहिती तंत्रज्ञान प्रकल्पाच्या विकास किंवा अंमलबजावणीसाठी जबाबदार असलेल्या किमान दोन सदस्यांनी निवड करुन समितीसमोर प्रकल्पाचे सादरीकरण करणे आवश्यक राहील.
- निवड झालेल्या प्रकल्पाचे प्रत्यक्ष प्रात्यक्षिक करणे तांत्रिकदृष्ट्या शक्य नसल्यास, त्यासंबंधीची अडचण समितीला पुरेशा कालावधीपूर्वी कळविणे आवश्यक राहील. समितीच्या पुर्वपरवानगीने अशा प्रकल्पाचे स्क्रीनशॉटच्या माध्यमातुन सादरीकरण करता येईल.
- सदर समितीस पहिल्या तीन स्पर्धांच्या विद्यमान अभ्यासक्रमामध्ये आवश्यक सुधारणा सुचविण्याचा अधिकार राहील .

## ३. नियम आणि मार्गदर्शक सूचना

- मागील ५ वर्षातील महाराष्ट्र राज्य पोलीस कर्तव्य मेळावामध्ये सलग सहभाग घेतलेल्या स्पर्धकांची निवड करण्यात येऊ नये.
- स्पर्धकांनी स्पर्धेच्या तारखेला संबंधित संस्था/ विभागामध्ये तीन महिन्यांपेक्षा जास्त काळ सेवा पूर्ण केलेली असावी.
- एखाद्या स्पर्धकाने अखिल भारतीय पोलीस कर्तव्य मेळाव्यामध्ये सहभागी होऊन सुवर्ण, रजत, कांस्य पदक प्राप्त केले असल्यास त्याला पुढील सलग तीन मेळाव्यांमध्ये भाग घेण्याची परवानगी दिली जाणार नाही.

**४. स्पर्धेचे स्वरूप व निकष :**

| अक्र. | निकष | स्पर्धा I | स्पर्धा II | स्पर्धा III | स्पर्धा IV |
|---|---|---|---|---|---|
| A | पात्रता दर्जा | ASI/ समकक्ष पदापर्यंत | DySP/ समकक्ष पदापर्यंत | DySP/ समकक्ष पदापर्यंत | DySP/ समकक्ष पदापर्यंत |
| B | कमाल स्पर्धक संख्या | ४ | २ | २ | ३ (एक संघ म्हणून) |
| C | कालावधी | ९० मिनिटे | ६०मिनिटे + PPT साठी अतिरिक्त ३0 मिनिटे | ९० मिनिटे | ६० मिनिटे |
| D | कमाल गुण | १०० | १०० | १०० | १०० |
| E | नकारात्मक गुणांकन | प्रत्येक चुकीच्या उत्तरासाठी २५% गुण वजा | -- | प्रत्येक चुकीच्या उत्तरासाठी २५% गुण वजा | -- |
| F | परीक्षेचे स्वरूप | प्रश्नमंजुषा (Quiz) | प्रात्यक्षिक | प्रश्नमंजुषा (Quiz) | प्रात्यक्षिक व सादरीकरण |

**५. पात्रता** – NCRB वगळता सर्व राज्ये/केंद्रशासित प्रदेशातील पोलीस दल/CAPFs या स्पर्धेत सहभागी होण्यास पात्र असतील. NCRB ही स्पर्धा समन्वयीत व आयोजित करणार असल्याने सहभागी होण्यास पात्र राहणार नाही. तथापि, IB / NCRB कडून अपात्र घोषित करण्यात आले असल्यास संबंधित संस्थेला सहभागी होता येणार नाही.

**६. परिक्षक / पंचांचे पॅनल –**

स्पर्धा क्रमांक I ते III याकरिता या स्पर्धा समितीचे प्रमुख व संगणक शाखा,गुन्हे अन्वेषण विभागाकडील एक अथवा दोन संगणक तज्ञ हे परिक्षक म्हणून काम पाहतील.

स्पर्धा क्रमांक IV करिता महासंचालक,NCRB यांच्या मार्फत तांत्रिक पार्श्वभुमी असलेल्या तीन वरिष्ठ अधिका-यांची समिती नियुक्त करण्यात येईल. निवड झालेल्या घटकांनी आपला प्रकल्प NCRB येथे प्रत्यक्ष सादर करणे आवश्यक आहे.प्रकल्पाचे मुल्यमापन केल्यानंतर त्याचा निकाल सिलबंद लिफाफ्यात AIPDM चे सचिव यांचेकडे पाठविण्यात येईल.सदर निकालाची घोषणा संबंधित कार्यक्रमादरम्यान करण्यात येईल.

**७. आक्षेप नोंदविणे –**

स्पर्धा क्रमांक I ,II व III कोणत्याही संघाकडुन आक्षेप किंवा तक्रार नोंदविण्यात आल्यास मुख्य पंच यांचा निर्णय अंतिम व सर्व संघावर बंधनकारक राहील.

स्पर्धा क्रमांक IV साठी चॅम्पियन आयटी प्रकल्पाच्या अध्यक्षांचा निर्णय अंतिम व सर्व संघावर बंधनकारक राहील.

**८. गुण समान असल्यास –**

एखाद्या क्रमांकासाठी दोन किंवा अधिक स्पर्धक /संघांची गुणसंख्या समान असल्यास, पुढील पध्दतीचा अवलंब करण्यात येईल.

स्पर्धा क्रमांक I – सर्वाधिक गुण प्राप्त करणा-या स्पर्धकांस विजेता घोषित करण्यात येईल. गुणांकन समान असल्यास योग्य उत्तरांची संख्या तसेच चुकीच्या उत्तरांची संख्या विचारात घेण्यात येईल. नकारात्मक गुणांकन कमी असलेल्या स्पर्धकास विजेता घोषित करण्यात येईल. प्रत्येक सहभागी संघ या स्पर्धेसाठी जास्तीत जास्त चार स्पर्धक नामनिर्देशित करु शकतो. एकूण विजेता संघ निश्चित करण्यासाठी प्रत्येक संघातील सहभागी स्पर्धकांपैकी सर्वाधिक गुण मिळविण्या-या दोन स्पर्धकांचे गुण विचारात घेतले जातील.

स्पर्धा क्रमांक II - सर्वाधिक गुण प्राप्त करणा-या स्पर्धकांस विजेता घोषित करण्यात येईल. गुणांकन समान असल्यास योग्य उत्तरांची संख्या तसेच चुकीच्या उत्तरांची संख्या विचारात घेण्यात येईल. कमी चूका असलेल्या स्पर्धकास विजेता घोषित करण्यात येईल.

स्पर्धा क्रमांक III - सर्वाधिक गुण प्राप्त करणा-या स्पर्धकांस विजेता घोषित करण्यात येईल. गुणांकन समान असल्यास योग्य उत्तरांची संख्या तसेच चुकीच्या उत्तरांची संख्या विचारात घेण्यात येईल. कमी चूका असलेल्या स्पर्धकास विजेता घोषित करण्यात येईल.

स्पर्धा क्रमांक IV – चॅम्पियन आयटी प्रकल्प

प्रत्येक घटकाने आपल्या घटकांमध्ये कार्यान्वित केलेल्या सर्वोत्तम माहिती तंत्रज्ञान प्रकल्पाचा तपशील विहीत नमुन्यात कार्यक्रमाची अधिसूचना जारी झाल्यापासून 45 दिवसांच्या आत किंवा अधिसूचनेत नमुद केलेल्या अन्य दिनांकापर्यंत महासंचालक, NCRB यांच्याकडे सादर करणे आवश्यक आहे.

एखाद्या घटकाकडून एकापेक्षा अधिक प्रकल्प प्राप्त झाल्यास संबंधित घटकाला स्पर्धेसाठी प्रकल्प निवडण्यासाठी पर्याय देण्यात येईल. संबंधित घटकाकडून निर्धारीत मुदतीत उत्तर प्राप्त न झाल्यास सादरीकरणाच्या दिनांकाच्या आधारे सर्वात अलीकडील प्रकल्पाचा स्पर्धेसाठी विचार करण्यात येईल आणि इतर प्रकल्पांचा विचार केला जाणार नाही.

चॅम्पियन आयटी प्रकल्प समिती प्राप्त झालेल्या आयटी प्रकल्पांचे परिक्षण करून सादरीकरणासाठी काही प्रकल्पांची निवड करेल. निवड झालेल्या घटकांना नियुक्त समितीसमोर आपल्या प्रकल्पाचे प्रात्यक्षिक सादर करावे लागेल. समिती पुढील बाबींच्या आधारे प्रकल्पांचे मुल्यमापन करेल.

- पोलीस दल /सर्व सामान्य नागरीकांसाठी प्रकल्पाची उपयुक्तता
- वापरण्यास सुलभता
- कामाचा भार किती प्रमाणात कमी झाला आहे.
- सॉफ्टवेअर अभियांत्रिकी तत्वाचा किती प्रमाणात अवलंब करण्यात आला आहे.
- सदर प्रकल्पाचा वापर करणा-या वापर कर्तांची संख्या
- प्रकल्पाद्वारे करण्यात येणा-या व्यवहारांची संख्या

CPO/CAPFs कडून सादर करण्यात येणारा कोणताही माहिती तंत्रज्ञान प्रकल्प या स्पर्धेसाठी ग्राह्य धरला जाऊ शकतो. तथापि राज्य / केंद्रशासित प्रदेशाकडून सादर करण्यात येणारे आयटी प्रकल्प CCTNS वर विकसित केलेले असणे आवश्यक आहे.

- **प्रकल्प सादर करण्यासंबंधी अटी** –
  १. कोणत्याही घटकाला या स्पर्धेसाठी आधीपासून कार्यान्वित असलेले आणि मुल्यमापनासाठी पात्र असलेले सॉफ्टवेअर ॲप्लीकेशन सादर करता येईल.
  २. सदर ॲप्लीकेशन संबंधित घटकांच्या अंतर्गत (In – House) विकास पथकाद्वारे विकसित केलेले असणे अपेक्षित आहे. तथापि मूल्यमापनासाठी आवश्यक असलेली सर्व कागदपत्रे उपलब्ध करून देणे बंधनकारक राहिल.
  ३. घटकाला प्रकल्पासंबंधी सविस्तर माहिती असलेली कागदपत्रे सादर करण्याची परवानगी असेल व त्यामध्ये विकासकांची माहिती देखील समाविष्ट असणे आवश्यक आहे.
  ४. बाह्य संस्थेद्वारे विकसित करण्यात आलेले आणि पोलीस दलाच्या सक्रीय सहभागाने कार्यान्वित केलेले प्रकल्प देखील या स्पर्धेसाठी विचारात घेतले जातील.
- **प्रकल्प प्रमुखाने प्रकल्पाचे सादरीकरण करताना पुढील बाबींचा समावेश करावा** –
  प्रकल्पाची आवश्यकता, विश्लेषण, रचना, विकास, चाचणी, अंमलबजावणी, सुरक्षा, प्रशिक्षण, प्रकल्पाची पुढील दिशा/ भविष्यातील कार्ययोजना.
  प्रकल्पाचे प्रात्यक्षिक संबंधित सॉफ्टवेअर ॲप्लीकेशनचा वापर करणे आवश्यक आहे. आवश्यक वातावरण तयार करणे शक्य नसल्यास स्क्रीनशॉटच्या माध्यमातून प्रकल्पाचे सादरीकरण स्विकारले जाईल.
- प्रकल्पाचे मूल्यमापन

| अ.क्रं. | मूल्यमापन निकष | कमाल गुण |
|---|---|---|
| १. | सॉफ्टवेअर पॅकेज पूर्णपणे संस्थेअंतर्गत (In –House) विकसित केलेले असणे. उदा. 100% In –House विकसित प्रकल्पास 30 गुण मात्र प्रकल्पाच्या विकासामध्ये पोलीस विभागाचा सहभाग असल्यास त्यानंतर | 20 |

| | | |
|---|---|---|
| | कमाल गुण विचारात घेतले जातील. | |
| २. | पोलीस दल/ सर्वसामान्य नागरीकांसाठी उपयुक्तता उदा. अंतर्गत कार्यशीलता वाढविणे, कर्मचा-यांना होणारा लाभ इत्यादी | 10 |
| ३. | स्विकार्यता व वापरण्यास सुलभता – प्रकल्प किती कार्यालयांध्ये कार्यान्वित करण्यात आला, कोणत्या स्तरावर सेवा उपलब्ध करून देण्यात येत आहे. | 10 |
| ४. | सुरक्षा व सॉफ्टवेअर विकास प्रक्रिया – सॉफ्टवेअर डेव्हल्पमेंट लाईफ सायकल प्रक्रियेचा अवलंब, निर्धारीत मानकांचे पालन | 10 |
| ५. | त्रुटी व्यवस्थापन – हेल्प मॅसेज, एरर मॅसेज, कोडची गुणवत्ता, दस्तएवजीकरण, व्हर्जन मॅनेजमेंट, युजर फ्रेंडलीनेस | 15 |
| ६. | वापरण्यात आलेली साधने व तंत्रज्ञान – डेटाबेस | 10 |
| ७. | अंमलबजावणीचा कालावधी | 5 |
| ८. | नाविन्यपूर्णता | 20 |
| | एकूण | 100 |

**विजेता निश्चित करण्याची पद्धत –**

सर्वाधिक एकूण गुण प्राप्त करणारा प्रकल्प विजेता घोषित करण्यात येईल. समान गुण प्राप्त झाल्यास, अधिक ठिकाणी कार्यान्वित केलेल्या प्रकल्पास प्राधान्य देण्यात येईल.

विजेत्या प्रकल्पास "DG NCRB's Running Trophy for Empowering Police with Information Technology" हा फिरता चषक प्रदान करण्यात येईल.

**९. पारितोषिक (Prizes)**

**स्पर्धा क्रमांक I , स्पर्धा क्रमांक II, स्पर्धा क्रमांक III**

प्रत्येक स्पर्धेकरिता प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक प्राप्त करणाऱ्या स्पर्धकांना अनुक्रमे सुवर्ण, रौप्य व कांस्य पदक प्रदान करण्यात येईल.

**स्पर्धा क्रमांक IV :**

विजेत्या राज्य /केंद्रशासित प्रदेश तसेच विजेत्या CAPFs (केंद्रीय सशस्त्र पोलीस दल यांना ("DG NCRB's Running Trophy for Empowering Police with Information Technology" हा फिरता चषक प्रदान करण्यात येईल.

**१०. एकूण उत्कृष्ट कामगिरीसाठी सर्वोत्तम संघ (Best Team for Overall Performance)**

स्पर्धा क्रमांक I, II व III मधील एकत्रित कामगिरीच्या आधारे सर्वोत्तम संघ विजेता चषक देण्यात येईल.

एकूण कामगिरी निश्चित करण्याचे सूत्र :

स्पर्धा क्रमांक I ची सरासरी गुणसंख्या स्पर्धा क्रमांक +II ची गुणसंख्या स्पर्धा क्रमांक +III ची गुणसंख्या

स्पर्धा क्रमांक I मध्ये संघातील स्पर्धकांनी प्राप्त केलेल्या गुणांपैकी सर्वाधिक गुण मिळविणाऱ्या केवळ दोन स्पर्धकांच्या गुणांचा विचार करून सरासरी गुणसंख्या निश्चित करण्यात येईल.

**११. गुण समान असल्यास (Tie-Breaking Rule) :**

१. दोन किंवा अधिक संघांना समान एकूण गुण प्राप्त झाल्यास, स्पर्धा क्रमांक I मधील ज्या संघाची सरासरी गुणसंख्या अधिक असेल, त्या संघास उच्च क्रमांक देण्यात येईल.

२. एकूण एकत्रित गुणसंख्या तसेच स्पर्धा क्रमांक I ची सरासरी गुणसंख्या देखील समान असल्यास, स्पर्धा क्रमांक I मधील संबंधित संघांच्या स्पर्धकांपैकी ज्याने सर्वाधिक वैयक्तिक गुण प्राप्त केले असतील, त्या आधारे क्रमांक निश्चित करण्यात येईल.

उदाहरण :

समजा संघ A, संघ B आणि संघ C या तिन्ही संघांना अंतिम एकत्रित गुणसंख्या 7.6 इतकी समान प्राप्त झाली आहे.

संघ A ची स्पर्धा क्रमांक I मधील सरासरी गुणसंख्या – 4.0

संघ B ची स्पर्धा क्रमांक I मधील सरासरी गुणसंख्या – 4.1

संघ C ची स्पर्धा क्रमांक I मधील सरासरी गुणसंख्या – 4.0

या परिस्थितीत, स्पर्धा क्रमांक I मध्ये सर्वाधिक सरासरी गुणसंख्या असल्यामुळे संघ B प्रथम क्रमांकावर राहील.

द्वितीय व तृतीय क्रमांकासाठी संघ A व संघ C यांची सरासरी गुणसंख्या समान असल्याने, स्पर्धा क्रमांक I मधील स्पर्धकांच्या वैयक्तिक गुणांचा विचार करण्यात येईल.

| संघ A | गुण | संघC | गुण |
|---|---|---|---|
| स्पर्धक A1 | 6.0 | स्पर्धक C1 | 1.5 |
| स्पर्धक A2 | 2.0 | स्पर्धक C2 | 6.5 |

वरील उदाहरणात, चारही स्पर्धकांपैकी संघ C च्या स्पर्धक C2 याने 6.5 इतके सर्वाधिक गुण प्राप्त केले आहेत त्यामुळे संघ C ला द्वितीय क्रमांक देण्यात येईल आणि संघ A तृतीय क्रमांकावर राहील.

**अंतिम क्रमवारी :**

१. संघ B – प्रथम क्रमांक

२. संघ C – द्वितीय क्रमांक

३. संघ A – तृतीय क्रमांक

## अखिल भारतीय पोलीस कर्तव्य मेळाव्यासाठी माहिती तंत्रज्ञान प्राविण्य स्पर्धेचा अभ्यासक्रम

### स्पर्धा क्रमांक I ( इवेन्ट - I )

कालावधी : ९० मिनिटे ,कमाल गुण - १००

**संगणक तंत्रज्ञानातील मूलभूत तत्त्वे व अद्ययावत प्रवाह (Fundamental and Latest Trends in Computer Technology)**

- **परीक्षेचे स्वरूप :**

  ऑनलाईन वस्तुनिष्ठ स्वरूपाची परीक्षा

  (ON-LINE OBJECTIVE TYPE TEST)

  परीक्षेमध्ये पुढील प्रकारच्या प्रश्नांचा समावेश असेल :

  - बहुपर्यायी प्रश्न (Multiple Choice Questions)

  - रिक्त जागा भरा (Fill in the Blanks)

- बरोबर किंवा चूक (True or False)
- जोड्या जुळवा (Matching)

१. **संगणकाची मूलभूत तत्त्वे (Computer Fundamentals)**

- संगणकाची मूलभूत माहिती हार्डवेअर :, सॉफ्टवेअर, इनपुट व आउटपुट उपकरणे.
- ऑपरेटिंग सिस्टीमची मूलभूत माहिती (Windows/Linux).
- मेमरी, स्टोरेज उपकरणे व फाईल सिस्टीम.
- संख्या पद्धती (Number System) व माहिती/डेटाचे प्रतिनिधीत्व (Data Representation).
- संगणक नेटवर्किंगची मूलभूत माहिती – LAN, WAN, Internet, IP व DNS.

२. **कार्यालयीन स्वयंचलन व डिजिटल उत्पादकता (Office Automation & Digital Productivity)**

- वर्ड प्रोसेसिंग – फॉरमॅटिंग, टेम्पलेट्स, मेल मर्ज इत्यादी.
- स्प्रेडशीट – सूत्रे (Formulas), आलेख (Charts), मूलभूत डेटा विश्लेषण इत्यादी.
- सादरीकरणे (Presentations) – रचना, ॲनिमेशन व प्रभावी सादरीकरणाच्या सर्वोत्तम पद्धती.
- ई अधिकृत/मेलचा वापर व शासकीय-पत्रव्यवहारातील शिष्टाचार.
- स्कॅनिंग, प्रिंटिंग, फाईल प्रकारांचे रूपांतरण, प्रतिमा व फाईलचा आकार बदलणे इत्यादी.

**३. इंटरनेट व वेब तंत्रज्ञान (Internet & Web Technologies)**

- इंटरनेटची मूलभूत तत्त्वे व सेवा.
- वेब ब्राउझरचा वापर व प्रभावी शोध तंत्रे.
- क्लाऊड कॉम्प्युटिंग – SaaS, PaaS व IaaS या संकल्पनांची मूलभूत माहिती.
- वेब ॲप्लिकेशन व डेस्कटॉप ॲप्लिकेशन यांतील फरक.
- डिजिटल इंडिया उपक्रमांचा आढावा.

**४. सायबर सुरक्षा, डिजिटल स्वाक्षरी व डेटा संरक्षण (Cyber Security, Digital Signature & Data Protection)**

उच्च प्राधान्य – पोलीस कार्याशी संबंधित

अ) **प्रमाणीकरण व प्रवेश नियंत्रण**

- प्रमाणीकरण (Authentication) व प्रवेश नियंत्रण ( Access Control).
- संकेतशब्द धोरणे व सुरक्षित वापराच्या पद्धती.
- बहुघटक प्रमाणीकरण – (Multi-Factor Authentication– MFA) व OTP प्रणाली
- CAPTCHA / reCAPTCHA.
- बायोमेट्रिक प्रमाणीकरण.

ब) **एनक्रिप्शन व क्रिप्टोग्राफी (Encryption & Cryptography - मूलभूत संकल्पना)**

- एनक्रिप्शन व डिक्रिप्शन.
- सममितीय (Symmetric) व असममितीय (Asymmetric) एनक्रिप्शनमधील फरक.
- सार्वजनिक की (Public Key) व खाजगी की (Private Key).
- हॅशिंगची मूलभूत माहिती.

- सुरक्षित संवाद पद्धती – HTTPS व VPN ची मूलभूत माहिती.

क) **डिजिटल स्वाक्षरी व प्रमाणपत्र**

- डिजिटल स्वाक्षरी व डिजिटल स्वाक्षरी प्रमाणपत्र (Digital Signature Certificate – DSC).
- ईगव्हर्नन्स व शासकीय प्रक्रियां-मधील उपयोग.
- डिजिटल स्वाक्षरी व इलेक्ट्रॉनिक स्वाक्षरी यांमधील फरक.

**ड) संगणक व नेटवर्क सुरक्षा**

- अँटीव्हायरस, फायरवॉल, IDS/IPS यांची मूलभूत माहिती.
- सुरक्षित नेटवर्क व Wi-Fi संबंधी धोके.
- डेटा संरक्षण व सुरक्षित साठवणूक.
- एंडपॉइंट सुरक्षा (Endpoint Security).

**ई ) सायबर धोके व मालवेअर**

- फिशिंग, रॅन्समवेअर, ट्रोजन, व्हायरस व वर्म्स.
- सोशल इंजिनिअरिंगद्वारे होणारे हल्ले.
- सुरक्षित इंटरनेट ब्राउझिंगच्या पद्धती.

**फ ) सायबर फसवणुक – ( पोलीस कार्याच्या दृष्टीने जागरुकता)**

- OTP फसवणूक, UPI फसवणूक व ऑनलाइन घोटाळे.
- ओळख चोरी (Identity Theft) व आर्थिक फसवणूक.
- तक्रार नोंदविण्याच्या यंत्रणा व प्रतिसादाबाबत जागरूकता.

**५. डेटाबेस व डेटा व्यवस्थापन (Databases & Data Management)**

- डेटाबेसची मूलभूत माहिती – टेबल्स, रेकॉर्ड्स व कीज.
- SQL ची मूलभूत माहिती – SELECT, INSERT, UPDATE व DELETE.
- डेटा साठवणूक, पुनर्प्राप्ती (Retrieval), बॅकअप व पुनर्संचयितीकरण )Recovery).

**६. पोलीस कार्यातील उदयोन्मुख तंत्रज्ञान (Emerging Technologies in Policing)**

- कृत्रिम बुद्धिमत्ता (Artificial Intelligence – AI) व मशीन लर्निंग (Machine Learning – ML) यांची मूलभूत माहिती.
- AI चे उपयोग – चेहरा ओळख प्रणाली(Facial Recognition), व्हिडिओ विश्लेषण (Video Analytics) इत्यादी.
- बिग डेटा व डेटा विश्लेषण.
- इंटरनेट ऑफ थिंग्ज (Internet of Things – IoT).
- ब्लॉकचेनची मूलभूत माहिती.
- GIS व GPS चे विविध उपयोग.

**७. डिजिटल पोलीसिंग प्रणाली (Digital Policing Systems)**

- CCTNS प्रणालीचा आढावा व तिची कार्यपद्धती.कार्यक्षमता/
- ICJS (Interoperable Criminal Justice System).
- e-Courts, e-Prisons व e-Prosecution प्रणाली.

- गुन्हे विश्लेषणासाठी वापरण्यात येणारी साधने (Crime Analytics Tools).

**८. प्रोग्रामिंग व तर्कशक्तीची मूलभूत तत्त्वे (Basics of Programming & Logic)**

- अल्गोरिदम व फ्लोचार्ट.
- प्रोग्रामिंगच्या मूलभूत संकल्पना – व्हेरिएबल्स, लूप्स व कंडिशन्स.
- तार्किक विचारशक्ती व समस्या निराकरण क्षमता.

**९. माहिती तंत्रज्ञान प्रशासन व ईगव्हर्नन्स- (IT Governance & e-Governance)**

- ई.गव्हर्नन्सच्या मूलभूत संकल्पना-
- डिजिटल इंडिया उपक्रम.
- माहिती तंत्रज्ञान अधिनियम (IT Act) व सायबर कायद्यांची मूलभूत माहिती.
- डेटा प्रशासन (Data Governance) व नैतिकता (Ethics).

**स्पर्धा क्रमांक II – कार्यालयीन स्वयंचलन (Office Automation)**

कालावधी : ६० मिनिटे + PowerPoint सादरीकरणासाठी अतिरिक्त ३० मिनिटे ,कमाल गुण : - १००

- **अभ्यासक्रम : विषय**

MS Office २०२१ अद्ययावत आवृत्ती

**स्पर्धेमध्ये पुढील बाबींचा समावेश असेल :**

**१. MS-Word मध्ये मजकूर टंकलेखन :**

स्पर्धकांचा टंकलेखनाचा वेग व अचूकता तपासण्यात येईल.

**२. MS-PowerPoint मध्ये सादरीकरण तयार करणे :**

MS-PowerPoint चा वापर करून 7 पानांचे.स्लाईडचे सादरीकरण साहित्य तयार करणे/

**३. MS-Excel मध्ये तक्ता व आलेख तयार करणे :**

- MS-Excel मध्ये तक्ता तयार करणे.
- विविध प्रकारचे आलेख तयार करणे, उदा: .
  - Pie Chart
  - Histogram
  - Bar Chart
  - Line Chart इत्यादी.
  - Pivot Table तयार करणे.
  - तयार केलेल्या दस्तऐवजाचेमाहितीचे मुद्रण/ (Print) करणे.

**४. AI साधने व इंटरनेट वापरास मनाई :**

स्पर्धेच्या परीक्षेदरम्यान कोणत्याही प्रकारच्या कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) आधारित साधनांचा तसेच इंटरनेटचा वापर करण्यास सक्त मनाई राहील.

**स्पर्धा क्रमांक III - सॉफ्टवेअर विकास क्षमता (Software Development Capability)**

कालावधी :१ तास, कमाल गुण : - १००

परीक्षेचे स्वरूप - बहुपर्यायी परीक्षा (MCQ Based)

अ) सर्व उमेदवारांसाठी समान विभाग **(Common Section for All Candidates)**

**१. प्रोग्रामिंगची मूलभूत तत्त्वे (Programming Fundamentals)**

- व्हेरिएबल्स, डेटा प्रकार व ऑपरेटर्स.
- नियंत्रण विधाने (Control Statements) व लूप्स.
- फंक्शन्स.मेथड्स/
- अॅरेज व स्ट्रिंग्स.
- मूलभूत डेटा स्ट्रक्चर्स.

**२. समस्या निराकरण व अल्गोरिदम (Problem Solving & Algorithms)**

- अल्गोरिदम व फ्लोचार्ट.
- तार्किक विचारशक्ती.
- शोध (Searching) व क्रमवारी लावणे (Sorting).
- स्ट्रिंग व संख्यांशी संबंधित समस्या.

**३. डेटाबेस व SQL – मूलभूत माहिती (Database & SQL – Basic)**

- टेबल्स, कीज व रिलेशनशिप्स.
- DDL, DML, DCL व TCL.
- फिल्टरिंग व जॉइन (Join) ऑपरेशन्स.
- फंक्शन्स, प्रोसिजर्स व ट्रिगर्स.
- क्वेरी ऑप्टिमायझेशन व इंडेक्सिंग.
- बॅकअप व रिस्टोअर.

**४. सॉफ्टवेअर अभियांत्रिकी व कोडिंग पद्धती (Software Engineering & Coding Practices)**

- सॉफ्टवेअर विकास जीवनचक्र (SDLC) – Waterfall व Agile ची मूलभूत माहिती.
- मॉड्युलर डिझाईन व पुनर्वापरयोग्यता (Reusability).
- स्वच्छ व सुस्पष्ट कोडिंगची तत्त्वे (Clean Code Principles).
- कोडची वाचनीयता व दस्तऐवजीकरण.
- व्हर्जन कंट्रोल – Git ची मूलभूत माहिती.
- चाचणी पद्धती – Unit Testing व Integration Testing ची मूलभूत माहिती.

**५. APIs व वेब सेवा (APIs & Web Services)**

- API च्या मूलभूत संकल्पना.
- REST APIs.
- HTTP पद्धती – GET, POST, PUT व DELETE.
- JSON ची रचना.
- Request–Response Cycle.

**६. आधुनिक सॉफ्टवेअर संरचना (Modern Architecture)**

- Monolithic व Microservices संरचनेतील फरक.

- Microservices ची मूलभूत माहिती – स्वतंत्र सेवा व विस्तारक्षमता (Scalability).
- API आधारित संवाद व्यवस्था.
- Cloud-Native संकल्पनेची मूलभूत माहिती.

**७. त्रुटी हाताळणी व डीबगिंग (Error Handling & Debugging)**

- Syntax Errors व Logical Errors मधील फरक.
- Exception Handling.
- त्रुटी शोधण्याच्या व निराकरणाच्या पद्धती (Debugging Techniques).

ब) **प्रोग्रामिंग भाषेनुसार विशेष विभाग ( (Language-Specific Section)**

**पर्याय क्रमांक** १ – **JAVA**

- Core Java – JVM, JDK व Control Statements.
- Object Oriented Programming (OOP) च्या संकल्पना.
- Collections – ArrayList व HashMap.
- Exception Handling.
- File Handling.
- Lambda Expressions व Stream API – मूलभूत माहिती.
- JDBC.
- REST API ची माहिती – Spring Boot च्या संदर्भातील मूलभूत संकल्पना.
- AJAX.

**पर्याय क्रमांक** २ – **.NET (C #)**

- ASP.NET / .NET Core ची मूलभूत माहिती.
- Object Oriented Programming (OOP) च्या संकल्पना.
- Collections – List व Dictionary.
- Exception Handling.
- File Handling.
- Entity Framework.
- ADO.NET.
- REST API ची माहिती – ASP.NET Core च्या संदर्भातील मूलभूत संकल्पना.
- MVC (Model View Controller).
- AJAX.

# (प्रवेश अर्ज)

१. संघाचे नाव :______________________________________________________

२. संघाचे प्रभारी अधिकारी यांचे नाव: ________________________________________

| अनुक्रमांक | स्पर्धकाचे नाव | पद आणि बक्कल क्रमांक |
|---|---|---|
| १. | | |
| २. | | |
| ३. | | |
| ४. | | |
| ५. | | |

**प्रमाणित करण्यात येते की :**

१. वर नमुद केलेल्या स्पर्धकांनी पोलीस विभागात तीन महिन्यांपेक्षा जास्त काळ सेवा पूर्ण केली आहे.

२. वरील स्पर्धकांपैकी कोणीही यापूर्वीच्या मागील तीन' अखिल भारतीय पोलीस कर्तव्य मेळाव्यामध्ये प्रथम, द्वितीय किंवा तृतीय स्थान मिळवलेले नाही.

३. वरील स्पर्धकांचे प्रवेश शुल्क महाराष्ट्र पोलीस कर्तव्य मेळाव्याच्या फंडात जमा करण्यात आले आहे

**सही**

**पो. आयुक्त/ विपोमनि.**

# ५. अॅन्टी सबोटेज चेक स्पर्धा

## १. नियम आणि मार्गदर्शक सूचना (Rules And Guidelines)

i) घटक प्रमुख यांनी प्रत्येक इव्हेंटसाठी दोन सदस्यांचा समावेश असलेला एक संघ निवडावा . कोणतीही व्यक्ती किंवा संघ दोनपेक्षा जास्त इव्हेंटमध्ये भाग घेऊ शकत नाही.

ii) स्पर्धकांनी स्पर्धेच्या तारखेला संबंधित संस्था/ विभागामध्ये तीन महिन्यांपेक्षा जास्त काळ सेवा पूर्ण केलेली असावी.

iii) एखाद्या स्पर्धकाने अखिल भारतीय पोलीस कर्तव्य मेळाव्यामध्ये सहभागी होऊन सुवर्ण, रजत, कांस्य पदक प्राप्त केले असल्यास त्याला पुढील सलग तीन मेळाव्यांमध्ये भाग घेण्याची परवानगी दिली जाणार नाही.

iv) मागील ५ वर्षातील महाराष्ट्र राज्य पोलीस कर्तव्य मेळावामध्ये सलग सहभाग घेतलेल्या स्पर्धकांची निवड करण्यात येऊ नये.

v) प्रात्यक्षिक चाचणीनंतर (Practical test) स्पर्धकांना तोंडी /लेखी परीक्षेला उपस्थित राहावे लागेल. जोपर्यंत तोंडी परीक्षेसाठी बोलावले जात नाही, तोपर्यंत सहभागी स्पर्धक त्यांच्यासाठी नेमून दिलेल्या जागेवरच बसतील. त्यानंतर, त्यांना माहिती आणि पुनरावलोकनासाठी (Debriefing) इव्हेंटच्या 'झिरो पॉईंट' (0 point) वर एकत्र यावे लागेल.

vi) स्पर्धकांनी स्वतःची उपकरणे सोबत आणावीत, जी पूर्णपणे सुस्थितीत (काम करण्याच्या स्थितीत) असावीत. आयोजकांकडून कोणतीही पर्यायी उपकरणे दिली जाणार नाहीत.

**२. साहित्य / उपकरणे (Equipment):**

खालील वस्तू अत्यंत आवश्यक मानल्या गेल्या आहेत:

(अ) स्फोटक शोधक यंत्र

(ब) माइन स्वीपर - भूसुरूंगांचा शोध घेणारे यंत्र

(क) हँडहेल्ड मेटल डिटेक्टर - हातातील धातू शोधक यंत्र)

(ड) नॉन-लिनियर जंक्शन डिटेक्टर (NLJD)

(इ) सर्च लाईट

(फ) प्रॉडर - तपासणीची सुळकी/सळई

(ग) आरसा- वाहनांखाली किंवा उंचावर तपासणी करण्यासाठी

**३. साधने / उपकरणे (Devices):**

लपवलेल्या साधनांमध्ये खालील गोष्टींचा समावेश असू शकतो:

(अ) वास्तविक स्फोटके

(ब) डमी डिटोनेटर्स

(क) ऊर्जा स्त्रोत - बॅटरी इ.

(ड) स्विच

**४. स्पर्धेचे प्रकार:**

ही स्पर्धा स्वतंत्रपणे खालील उप-इव्हेंट्स (Sub events) अंतर्गत आयोजित केली जाईल:

(अ) जमिनीवर शोध घेणे (Ground Search)

(ब) खोलीमध्ये शोध घेणे (Room Search)

(क) वाहनांची झडती घेणे (Vehicle Search)

(ड) प्रवेश नियंत्रण (Access Control) (DFMD, HHMD and X-Rays-BIS)

**५. कार्यपद्धती (Procedure):**

प्रत्येक संघाला घातपात विरोधी तपासणीचे इव्हेंट्स आयोजित करण्यासाठी एक निश्चित वेळ नेमून दिली जाईल. स्पर्धेचे उप प्रकार, एकुण गुण व गुणांची विभागणी खालीलप्रमाणे -

| अ. क्र. | स्पर्धा उप प्रकार | गुण | गुणांची विभागणी |
|---|---|---|---|
| १ | **ग्राउंड सर्च**<br><br>संघाचे (Team) गुण हे त्या संघातील स्पर्धकांच्या वैयक्तिक गुणांची बेरीज करून निश्चित केले जातील. | १०० (वैयक्तिक स्पर्धकांसाठी) मौखिक परीक्षा (Viva Voce) | अ) जमिनीत लपवून ठेवलेले दहा (१०) आयईडी (IEDs) किंवा त्यांचे सुटे भाग शोधण्यासाठी४० गुण (प्रत्येक १ आयईडी किंवा त्याचा सुटा भाग शोधण्यासाठी ४ गुण)(वेळ - २० मिनिटे)<br>ब)सुरक्षित करावयाच्या (Sanitized) क्षेत्राची अँटी-सॅबोटेज तपासणी करण्याच्या पद्धतीसाठी आणि उपकरणांच्या हाताळणीसाठी२० गुण<br>(पद्धतीसाठी १० गुण आणि उपकरणे हाताळण्यासाठी १० गुण)<br>क)स्फोटके आणि आयईडीचे (IEDs) सुटे भाग ओळखण्यासाठी२० गुण<br>ड) मौखिक/लेखी परीक्षा २० गुण |
| २ | **रूम सर्च**<br>संघाचे (Team) गुण हे त्या संघातील स्पर्धकांच्या वैयक्तिक गुणांची बेरीज करून निश्चित केले जातील. | १०० (वैयक्तिक स्पर्धकांसाठी) | अ) खोलीत लपवून ठेवलेले दहा (१०) आयईडी (IEDs) किंवा त्यांचे सुटे भाग शोधण्यासाठी ६० गुण (प्रत्येक १ आयईडी किंवा त्याचा सुटा भाग शोधण्यासाठी ६ गुण) (वेळ - २० मिनिटे)<br>ब)सुरक्षित करावयाच्या (Sanitized) क्षेत्राची अँटी-सॅबोटेज तपासणी (Anti Sabotage Check) करण्याच्या पद्धतीसाठी आणि उपकरणांच्या हाताळणीसाठी४० गुण (पद्धतीसाठी २० गुण आणि उपकरणे हाताळण्यासाठी २० गुण) |
| ३ | **व्हेईकल सर्च**<br>संघाचे (Team) गुण हे त्या संघातील स्पर्धकांच्या वैयक्तिक गुणांची बेरीज करून निश्चित केले जातील. | १०० (वैयक्तिक स्पर्धकांसाठी | अ) वाहनात लपवून ठेवलेले दहा (१०) आयईडी (IEDs) किंवा त्यांचे सुटे भाग शोधण्यासाठी ६० गुण (प्रत्येक १ आयईडी किंवा त्याचा सुटा भाग शोधण्यासाठी ६ गुण) (वेळ १५ मिनिटे)<br>ब) सुरक्षित करावयाच्या (Sanitized) वाहनाची अँटी-सॅबोटेज तपासणी (Anti Sabotage Check) करण्याच्या पद्धतीसाठी आणि उपकरणांच्या हाताळणीसाठी ४० गुण (पद्धतीसाठी २० गुण आणि उपकरणे हाताळण्यासाठी २० गुण) |
| ४ | **अ‍ॅक्सेस कंट्रोल डीएफएमडी (DFMD), एचएचएमडी (HHMD)**<br><br>संघाचे (Team) गुण हे त्या | १०० (वैयक्तिक स्पर्धकांसाठी | वैयक्तिक तपासणी आणि अंगझडती (Personal Search and Frisking) – DFMD आणि HHMD - १०० गुण<br>१. DFMD आणि HHMD चा वापर करून व्यक्तीच्या अंगावर लपवलेल्या ५ वस्तू शोधणे – ३० |

| | | | |
|---|---|---|---|
| | संघातील स्पर्धकांच्या वैयक्तिक गुणांची बेरीज करून निश्चित केले जातील. | | गुण, (प्रत्येक १ आयईडी किंवा त्याचा सुटा भाग शोधण्यासाठी ६ गुण (वेळ ०३ मिनिटे)<br>२. आयईडी शोधणे कार्यपद्धती (Procedure) आणि उपकरणांची हाताळणी - १० गुण<br>३.मौखिक/लेखी परीक्षा (Viva-Voce) – यामध्ये DFMD आणि HHMD चे फायदे व मर्यादा, तसेच सध्या उपलब्ध असलेल्या व DFMD आणि HHMD ऐवजी वैयक्तिक अंगझडतीसाठी वापरल्या जाणाऱ्या अद्ययावत उपकरणांच्या ज्ञानावर आधारित प्रश्न विचारले जातील –१० गुण<br>ब ) सामानाची तपासणी – ५० गुण<br>१) एक्सरे ,बीआयएस चा वापर करुन सामानात लपवलेल्या ५ वस्तु शोधण्यासाठी -३० गुण (प्रत्येक १ आयईडी किंवा त्याचा सुटा भाग शोधण्यासाठी ६ गुण (वेळ ०५ मिनिटे)<br>२) कार्यपद्धती (Procedure) आणि उपकरणांची हाताळणी - १० गुण<br>३) मौखिक/लेखी परीक्षा (Viva-Voce) – यामध्ये एक्सरे ,बीआयएस चे फायदे व मर्यादा, विविध प्रकारच्या बीआयएसचे ज्ञान आणि सामानाच्या तपासणीसाठी उपलब्ध असलेल्या अद्यावत उपकरण प्रणालीबद्दल प्रश्न विचारले जातील –१० गुण |

**६. परिक्षक -**

या स्पर्धेसाठी, या स्पर्धा समितीचे प्रमुख व इतर दोन घातपात विरोधी पथकातील तज्ञ पोलीस अधिकारी/ अंमलदार हे परिक्षक म्हणून काम पहातील. सर्व बाबींमध्ये परीक्षकांचा निर्णय अंतिम असेल आणि तो स्पर्धकांवर बंधनकारक राहील.

**७. चषक व पदके -**

i. ॲन्टी सेबोटेज चेक स्पर्धेसाठी विजेत्या संघास फिरता चषक देण्यात येईल.
ii. ज्या संघाची कामगिरी सर्वोत्तम असेल त्या संघास श्री. ए. एम. कामठे हा फिरता चषक प्रदान करण्यात येईल.
iii. प्रत्येक उप स्पर्धा प्रकारातील १, २ वा ३ क्रमांकाचे स्पर्धकांना सुवर्ण, रजत व कांस्य पदके व प्रमाणपत्रे प्रदान करण्यात येतील.

# घातपात विरोधी तपासणी स्पर्धा

## (प्रवेश अर्ज)

१.संघाचेनाव :______________________________________________________________

२.संघाचे प्रभारी अधिकारी यांचे नाव: ____________________________________

| अनुक्रमांक | स्पर्धकाचे नाव | पद आणि बक्कल क्रमांक |
|---|---|---|
| १. | | |
| २. | | |
| ३. | | |
| ४. | | |
| ५. | | |
| ६. | | |
| ७. | | |
| ८. | | |

**प्रमाणित करण्यात येते की :**

१. वर नमुद केलेल्या स्पर्धकांनी पोलीस विभागात तीन महिन्यांपेक्षा जास्त काळ सेवा पूर्ण केली आहे.

२. वरील स्पर्धकांपैकी कोणीही यापूर्वीच्या मागील तीन 'अखिल भारतीय पोलीस कर्तव्य मेळाव्यामध्ये प्रथम, द्वितीय किंवा तृतीय स्थानमिळवलेले नाही.

३. वरील स्पर्धकांचे प्रवेश शुल्क महाराष्ट्र पोलीस कर्तव्य मेळाव्याच्या फंडात जमा करण्यात आले आहे

**सही**

**पो. आयुक्त/ विपोमनि.**

# ६. श्वानस्पर्धा

## १. नियम (Rules):-

१. पोलीस श्वान पथकांमध्ये कार्यरत असलेल्या सर्व पोलीस श्वानांसाठी (कोणत्याही जातीच्या/Breed च्या) ही स्पर्धा खुली असेल.

२. स्पर्धेत समाविष्ट केलेल्या सर्व श्वानांकडे 'केनेल क्लब ऑफ इंडिया' (Kennel Club of India) चे वंशावळ प्रमाणपत्र (Pedigree Papers) आणि नोंदणी प्रमाणपत्र (Registration certificate) असणे आवश्यक आहे. परदेशातून आयात केलेल्या श्वानांच्या बाबतीत या अटी शिथिल केल्या जातील आणि ज्या देशातून श्वान आयात केला आहे, त्या देशाचे नोंदणी व वंशावळ प्रमाणपत्र दाखवून त्यांना स्पर्धेत भाग घेण्याची परवानगी दिली जाईल.

३. १८ महिन्यांपेक्षा कमी वय असलेल्या कोणत्याही श्वानाला स्पर्धेत प्रवेश दिला जाणार नाही.

४. ऋतू चक्रात (In season) असलेल्या किंवा ३३ दिवसांपेक्षा जास्त काळाची गर्भधारणा (Pregnancy) असलेल्या कोणत्याही श्वानाला (मादीला) स्पर्धेत भाग घेण्याची किंवा चाचणीच्या मैदानावर येण्याची परवानगी दिली जाणार नाही.

५. स्पर्धेत सहभागी होणाऱ्या सर्व श्वानांचे, स्पर्धा सुरू होण्याच्या किमान २१ दिवस आधी विविध घातक सांसर्गिक आजारांविरुद्ध लसीकरण (Vaccination) केलेले असणे अनिवार्य आहे.

६. पशुवैद्यकीय तपासणी (Veterinary examination) आणि कागदपत्रांची पडताळणी पूर्ण केल्याशिवाय कोणत्याही श्वानाला स्पर्धेच्या मैदानात प्रवेश दिला जाणार नाही.

७. मैदानावर प्रवेश देण्यापूर्वी, समितीद्वारे नियुक्त केलेल्या दोन पशुवैद्यकीय डॉक्टरांच्या पॅनेलद्वारे प्रत्येक श्वानाची सखोल आणि कसून तपासणी केली जाईल.

८. जो श्वान पूर्णपणे आंधळा असेल, ऐकण्यात दोष असेल, कोणत्याही संसर्गजन्य किंवा संक्रामक आजाराने ग्रस्त असेल किंवा ज्याच्या शरीरात अशी कोणतीही विकृती (Deformity) असेल ज्यामुळे त्याच्या कामगिरीत अडथळा निर्माण होऊ शकतो, असा श्वान या स्पर्धेसाठी पात्र ठरणार नाही.

९. कोणत्याही श्वानासाठी प्रवेश शुल्क (Entry fee) आकारले जाणार नाही, परंतु श्वान हँडलरसाठी (Dog handler) प्रवेश शुल्क आकारले जाईल.

१०. स्पर्धकांनी स्पर्धेच्या तारखेला संबंधित संस्था/विभागामध्ये तीन महिन्यांपेक्षा जास्त काळ सेवा पूर्ण केलेली असावी.

११. एखाद्या स्पर्धकाने अखिल भारतीय पोलीस कर्तव्य मेळाव्यामध्ये सहभागी होऊन सुवर्ण, रजत, कांस्य पदक प्राप्त केले असल्यास त्याला पुढील सलग तीन मेळाव्यांमध्ये या स्पर्धेत भाग घेण्याची परवानगी दिली जाणार नाही.

१२. मागील ५ वर्षातील महाराष्ट्र राज्य पोलीस कर्तव्य मेळावामध्ये सलग सहभाग घेतलेल्या स्पर्धकांची निवड करण्यात येऊ नये.

१३. स्पर्धेत आपले श्वान उतरवणाऱ्या प्रत्येक घटकाने महाराष्ट्र राज्य पोलीस कर्तव्य मेळावा स्पर्धेच्या नियमांचे पालन करण्याचे मान्य केले आहे असे मानले जाईल आणि याच अटीवर त्यांचे प्रवेश अर्ज स्वीकारले जातील.

१४. केनेल्सपासून ते स्पर्धेच्या मैदानापर्यंत श्वानांच्या वाहतुकीची (Transportation) व पुन्हा परत आणण्याची व्यवस्था संघ प्रमुखाची राहील.

१५. श्वानांच्या अन्नाची (खाद्याची) व इतर व्यवस्था स्पर्धेत श्वान उतरवणाऱ्या संबंधित संघटनेच्या प्रभारी अधिकाऱ्यांकडून केली जाईल. आयोजन समिती वाजवी दरात अन्न इत्यादी मिळवून देण्यासाठी मदत करेल. प्रत्येक श्वान प्रदर्शकाने स्वतःच्या गाद्या, ग्रुमिंगचे साहित्य, खाण्याचे भांडे/साहित्य, स्पर्धेसाठी लागणारे साहित्य जसे की - हार्नेस, चोक-चेन, कॉलर, लीश, ट्रॅकिंग लीड, डंबेल इत्यादी सोबत आणावे, तसेच श्वानाला किंवा हँडलरला तात्काळ आवश्यकता भासल्यास प्रथमोपचार व्यवस्था जवळ ठेवावी.

१६. श्वान हँडलर त्यांच्या संबंधित संघटनांनी विहित केलेला आपआपल्या 'श्वान पथकाचा गणवेश' (Dog Units Uniforms) सोबत आणतील.

१७. स्पर्धेच्या वेळी, ज्या मैदानावर स्पर्धा घेतली जात आहे तिथे केवळ श्वान हँडलर आणि श्वान पथकाच्या प्रभारी अधिकाऱ्यालाच प्रवेश करण्याची परवानगी असेल.

१८. पशुवैद्यकीय तपासणी झाल्यानंतर, श्वान आणि श्वान हँडलरला पंचांद्वारे दिलेला चेस्ट नंबर असलेला एक कार्ड दिला जाईल.

१९. प्रत्येक सराव/कसरत संपल्यानंतर हँडलर आपल्या श्वानाची प्रशंसा करू शकतो, त्याला बक्षीस देऊ शकतो आणि थोपटू शकतो, परंतु सराव सुरू असताना असे करता येणार नाही.

२०. पंच सरावाचे काही वेळापत्रक निश्चित करतील आणि स्टीवर्ड्सना (Stewards - मैदान व्यवस्थापक/सहाय्यक) आज्ञा/कमांड देण्याच्या सूचना करतील. त्यानुसार, सराव आणि श्वानाचे काळजीपूर्वक निरीक्षण केले पाहिजे. श्वानाला कोणताही इशारा देणे किंवा बाहेरील व्यक्तीच्या मदतीने कसरत करून घेणे असे आढळून आल्यास कठोर दंड केला जाईल.

## २. श्वानांची कोठडी आणि काळजी:

१. श्वानाला अन्न देणे आणि पाणी देण्याची जबाबदारी पूर्णपणे हँडलरची असेल.

२. अपघात किंवा इतर कोणत्याही कारणास्तव, अथवा स्वतः समिती, त्यांचे अधिकारी, सेवक किंवा इतरांच्या कोणत्याही कृतीमुळे कोणत्याही व्यक्तीचे, श्वानाचे किंवा मालमत्तेचे नुकसान झाल्यास, ते गहाळ झाल्यास किंवा स्थानबद्ध झाल्यास आयोजन समिती जबाबदार राहणार नाही.

३. श्वान हस्तक यांनी त्यांचे श्वान कोणत्याही स्पर्धकास किंवा इतर कोणत्याही व्यक्तीस इजा पोहचविणार नाही याची काळजी घ्यावी.

## ३.परीक्षक:

१. या स्पर्धेसाठी या स्पर्धा समितीचे प्रमुख व इतर दोन ते तीन तज्ञ श्वान प्रशिक्षक हे परिक्षक म्हणून काम पाहतील. परीक्षक हे सेवा निवृत्त अथवा सेवेत असणारे राज्य पोलीस दल/केंद्रिय सुरक्षा बल/केंद्रिय रिझर्व्ह पोलीस फोर्स/एन.डी.आर.एफ/बीएसएफ (BSF)/लष्कर (Army) मधील श्वान हाताळणे अनुभव असलेले असावेत. स्पर्धांचे योग्य समन्वय राखणे आणि स्पर्धा सुरळीत व वेळेत पार पाडणे ही त्यांची जबाबदारी असेल.

२. समितीने नियुक्त केलेले कोणतेही मुख्य पंच उपस्थित राहण्यास असमर्थ ठरल्यास, त्यांच्या जागी पर्यायी मुख्य पंच नियुक्त करण्याचा अधिकार आयोजन समितीकडे राखीव राहील.

३. मुख्य पंचांचा निर्णय नेहमी अंतिम असेल.

४. लाऊड स्पीकरच्या साहाय्याने स्पष्ट घोषणा करून मुख्य पंचांच्या रिंगमध्ये (Judging ring) आवश्यक असलेल्या श्वानांचे क्रमांक पुकारले जातील. क्रमांक पुकारताच हँडलर्सनी आपल्या श्वानांसह रिंगमध्ये प्रवेश करण्यासाठी तयार राहिले पाहिजे.

## ट्रेड चाचणी

ही स्पर्धा अधिक व्यावसायिक आणि कौशल्यभिमुख बनवण्यासाठी, खालील तीन ट्रेड्स (Trades/शाखा) अंतर्गत चाचणी घेतली जाईल:

१. **ट्रॅकर (Tracker - माग काढणारे श्वान)**
२. **एक्सप्लोसिव्ह (Explosive - स्फोटक शोधक श्वान)**
३. **नारकोटिक्स (Narcotics - अंमली पदार्थ शोधक श्वान)**

१. जात (Breed) आणि लिंग (Sex) यांचा कोणताही विचार न करता सर्व श्वानांना या स्पर्धेत भाग घेण्याची परवानगी असेल.

२. श्वानांच्या एका संघात किमान **तीन श्वान** आणि कमाल **सहा श्वान** असणे आवश्यक आहे. कोणत्याही एका ट्रेडमध्ये (शाखेत) एका संघातील दोनपेक्षा जास्त श्वान सहभागी होऊ शकत नाहीत.

३. एखाद्या विशिष्ट 'अखिल भारतीय पोलीस कर्तव्य मेळाव्या' (AIPDM) मध्ये पदक जिंकणाऱ्या श्वानाला आणि त्याच्या हँडलरला केवळ **एका वर्षासाठी** सहभाग घेता येणार नाही. जर एखादा श्वान MSPDM मध्ये सहभागी होण्यासाठी पात्र नसतानाही फसवणुकीने किंवा चुकीमुळे स्पर्धेत सहभागी झाला, तर योग्य चौकशी अंती त्याचे पदक काढून घेऊन ते त्यानंतरच्या सर्वोत्तम (पुढील क्रमांकाच्या) श्वानाला प्रदान केले जाईल.

### १. ट्रॅकर चाचणी आयोजित करण्यासाठी मार्गदर्शक सूचना:

१. **आज्ञापालन चाचणी (Obedience Test):**यामध्ये 'हील फ्री' (Heel free - पट्ट्याशिवाय सोबत चालणे), 'सिट' (Sit - बसणे), 'अप' (Up - उठणे/उभे राहणे) आणि 'कम' (Come - जवळ येणे) यांचा समावेश असेल. श्वानाने नेहमी हँडलरच्या डाव्या बाजूने चालणे आवश्यक आहे. 'हील फ्री' कसरतीमध्ये डावीकडे वळणे, उजवीकडे वळणे तसेच वेगवान, मध्यम आणि संथ गतीने चालणे या बाबी पूर्ण कराव्या लागतील. श्वान मागे रेंगाळल्यास किंवा हँडलरच्या पुढे निघून गेल्यास ५ गुण वजा (दंड) केले जातील. थांबण्याच्या (Halt) प्रत्येक आदेशावर श्वान स्वतःहून बसेल. 'सिट', 'अप' आणि 'कम' या प्रत्येक कृतीसाठी केवळ एकच शाब्दिक आदेश (Command) दिला जाईल. हँडलरने दिलेला प्रत्येक अतिरिक्त आदेश किंवा संकेतासाठी (Signal) ५ गुण वजा केले जातील.

२. **अनोळखी व्यक्तींकडून अन्न नाकारणे (Refusal of Food from Strangers):**ही कसरत चाचणीदरम्यान कोणत्याही वेळी अनोळखी व्यक्तीद्वारे केली जाऊ शकते. श्वानाला भुरळ पाडेल असे कच्चे मांस, यकृत (Liver), बिस्किट किंवा इतर कोणतीही वस्तू वापरून श्वानाची परीक्षा घेतली जाऊ शकते. यासाठी वाडग्यातील पाण्याचा देखील वापर केला जाऊ शकतो.

३. **वस्तू परत आणणे (Retrieve):**प्रत्येकी ३ फूट उंचीचे दोन अडथळे किमान १० फूट अंतरावर ठेवले जातील. श्वानाला हँडलरने दिलेला डंबेल (Dumbbell) घेऊन जाताना आणि परत येताना, अशा दोन्ही वेळेस या अडथळ्यांवरून उडी मारून तो परत आणावा लागेल. कसरत पूर्ण करताना श्वानाने हँडलरच्या पायापाशी (Heel) येऊन बसणे आवश्यक आहे; यासाठी 'फेच' (Fetch - आण), 'सीझ' (Cease - सोड) आणि 'हील' (Heel - सोबतीला ये) असा प्रत्येकी एकच आदेश दिला जाईल. आदेश देण्यापूर्वी केलेली कोणतीही अतिरिक्त कृती किंवा अतिरिक्त आदेशासाठी ५ गुण वजा केले जातील. वस्तू तोंडात चघळल्यास (Mouthing) किंवा वाटेत पाडल्यास ५ गुण वजा केले जातील.

४. **शोधणे किंवा शोधून काढणे (Seek for Find):**हँडलर चालत असताना स्वतःची एक लहान सपाट वस्तू (लेदर डायरी किंवा पाकीट) खाली पाडेल. किमान ५० यार्ड पुढे गेल्यानंतर श्वानाला ती वस्तू शोधण्यासाठी मागे

पाठवले जाईल. श्वानाला हँडलरच्या गंधाचा (वासाचा) सुगावा दिला जाईल आणि 'सीक' (Seek) किंवा 'फाइंड' (Find) चा आदेश दिला जाईल. श्वानाने त्या वस्तूशी खेळू नये किंवा ती वाटेत पाडू नये, अन्यथा ५ गुण वजा केले जातील. श्वान आणि हँडलरला सरळ रेषेतील मार्गावर पाठवले जाणार नाही. 'सीक' किंवा 'फाइंड' चा एक आदेश आणि वस्तू आणण्यासाठी 'फेच' चा एक आदेश देण्यास परवानगी आहे. प्रत्येक अतिरिक्त संकेत किंवा आदेशासाठी प्रत्येक वेळी ५ गुण वजा केले जातील.

५. **गंध फरक ओळखणे (Scent Discrimination) :**कसरत सुरू होण्याच्या एक मिनिट आधी सहा रुमाल प्रेक्षकांकडे दिले जातील. पंचाच्या गंधाचा रुमाल देखील त्या सहा रुमालांमध्ये ठेवला जाईल. हे सर्व रुमाल कोणत्याही रचनेत एका ओळीत मांडले जातील. रुमाल ठेवण्याच्या या प्रक्रियेदरम्यान, श्वान आणि हँडलरचे तोंड विरुद्ध बाजूला असेल (ते हे पाहू शकणार नाहीत). चुकीचा रुमाल दर्शवल्यास (Wrong indication) १० गुण वजा केले जातील. रुमाल तोंडात चघळल्यास किंवा पाडल्यास ५ गुण वजा केले जातील. या कसरतीसाठी कमाल (जास्तीत जास्त) १० मिनिटांचा वेळ दिला जाईल.

६. **गंध ओळखणे (Scent Identification):**या कसरतीमध्ये, संशयित व्यक्तीसह १० व्यक्ती कोणत्याही रचनेत उभ्या राहतील. संशयित व्यक्तीचा रुमाल, जोडा, चाकू किंवा गुन्ह्यात वापरलेले कोणतेही शस्त्र यांद्वारे श्वानाला गंध दिला जाईल. श्वानाने संशयित व्यक्तीचा उजवा हात पकडून त्याला पकडले पाहिजे. संशयित व्यक्तीव्यतिरिक्त इतर कोणत्याही व्यक्तीवर झेप घेतल्यास ५ गुणांचे नकारात्मक गुणदान (Negative marking) केले जाईल. या कसरतीसाठी कमाल १० मिनिटांचा वेळ दिला जाईल.

७. **माग काढणे (Tracking):**माग काढण्याचा मार्ग (Track) ५०० यार्डपेक्षा कमी नसावा. मार्ग तयार करताना पंचानी त्या भागाची भौगोलिक रचना (Topography) आणि मातीची स्थिती विचारात घेतली पाहिजे. त्यानुसार, वळणे (Curves) आणि क्रॉस ट्रॅकिंग (Cross tracking) आधीच निश्चित केले जावे, परंतु त्यांची संख्या ठरवून ठेवू नये. पंच प्रत्येक श्वानासाठी वेगळा मार्ग निश्चित करतील. गंध घेण्यासाठी श्वानाला संशयित व्यक्तीचा जोडा, चप्पल, चाकू, गुन्ह्यात वापरलेले शस्त्र, डोक्याचे कापड (रुमाल/पगडी) किंवा इतर कोणतीही योग्य वस्तू दिली जाईल. श्वानाने त्या जागेवरून गंध घेऊन व्यक्तीचा माग काढला पाहिजे. (यावेळी श्वानाला ३० फुटांच्या ट्रॅकिंग पट्ट्यावर ठेवले जावे). श्वानाला प्रोत्साहन देण्यास परवानगी आहे, परंतु दिशा दर्शवणारा कोणताही संकेत किंवा आदेश देण्यास परवानगी नाही. श्वानाने संशयित व्यक्तीला शोधून काढल्यावर ही कसरत संपते. जर श्वान मूळ मार्ग चुकला, तर पुन्हा नव्याने शोध घेण्याची (Recast) किंवा रि-ट्रॅकिंगची परवानगी नाही; मात्र पाणी, भिंती यांसारखे अडथळे आल्यास, त्याच ठिकाणी पुन्हा नव्याने शोध घेण्याची (Recasts) परवानगी दिली जाईल. जर श्वान १०० यार्डपेक्षा जास्त अंतरापर्यंत चुकीच्या मार्गावर गेला, तर पंच श्वानाला अपात्र ठरू शकतात. मार्ग जेथे संपतो आणि जेथे संशयित व्यक्ती उभी असते, तिथे एक पंच तैनात असायला हवेत. माग काढण्याची संपूर्ण वेळ ४५ मिनिटांपेक्षा जास्त नसावी.

## ट्रॅकिंग चाचणी गुणदान पद्धत:

| अ. क्र. | चाचणी | गुण |
|---|---|---|
| १) | आज्ञापालन चाचणी | २५ गुण |
| २) | अन्न नकार | २५ गुण |
| ३) | प्रत्येकी ३ फूट उंचीच्या दोन अडथळ्यांवरून वस्तू परत आणणे | २५ गुण |

| | | |
|---|---|---|
| ४) | शोधणे किंवा शोधून काढणे | २५ गुण |
| ५) | गंध फरक ओळखणे - | ५० गुण |
| ६) | गंध ओळखणे | ५० गुण |
| ७) | पट्ट्यासह (On lead) ५०० ते कमाल ६०० यार्ड अंतरापर्यंत माग काढणे. यामध्ये दोन वळणे (Curves) आणि एक क्रॉस (Cross) असेल. हा माग १ तास जुना असेल. | २०० गुण |
| **एकूण** | | **४०० गुण** |

## २. स्फोटक शोधक चाचणी आयोजित करण्यासाठी मार्गदर्शक सूचना:

चाचणीसाठी वापरण्यात येणारी स्फोटके कमी क्षमतेची स्फोटके (उदा. दारूगोळा/Gunpowder) तसेच उच्च क्षमतेच्या स्फोटक गटातील (उदा. डायनामाईट, टीएनटी, सी४, प्लास्टिक स्फोटके, आरडीएक्स, सेम्टेक्स किंवा यांसारखी नवीन उपलब्ध झालेली स्फोटके) असतील. (लपवलेल्या स्फोटकांचा उल्लेख यापुढे 'वस्तू' किंवा 'आर्टिकल्स' असा केला जाईल). लपवल्या जाणाऱ्या वस्तूचे वजन १०० ग्रॅमपेक्षा कमी नसावे.

१. **आज्ञापालन चाचणी (Obedience Test):**यामध्ये 'हील फ्री' (पट्ट्याशिवाय सोबत चालणे), 'सिट' (बसणे), 'अप' (उठणे) आणि 'कम' (जवळ याणे) यांचा समावेश असेल. श्वानाने नेहमी हँडलरच्या डाव्या बाजूने चालले पाहिजे. 'हील फ्री' मध्ये डावीकडे वळणे, उजवीकडे वळणे तसेच वेगवान, मध्यम आणि संथ गतीने चालणे या बाबी पूर्ण कराव्या लागतील. श्वान मागे रेंगाळल्यास किंवा हँडलरच्या पुढे निघून गेल्यास ५ गुण वजा (दंड) केले जातील. थांबण्याच्या प्रत्येक आदेशावर श्वान स्वतःहून बसेल. 'सिट', 'अप' आणि 'कम' या प्रत्येक कृतीसाठी केवळ एकच शाब्दिक आदेश दिला जाईल. हँडलरने दिलेल्या प्रत्येक अतिरिक्त आदेशासाठी किंवा संकेतासाठी (सिग्नल) ५ गुण वजा केले जातील.

२. **अनोळखी व्यक्तींकडून अन्न नाकारणे (Refusing Food from Strangers):**ही कसरत चाचणीदरम्यान कोणत्याही वेळी केली जाऊ शकते. श्वानाला आकर्षित करेल असे कच्चे मांस, यकृत (Liver), बिस्किट किंवा इतर कोणत्याही वस्तूचा वापर करून परीक्षा घेतली जाऊ शकते. यासाठी वाडग्यातील पाण्याचा देखील वापर केला जाऊ शकतो.

३. **जमिनीवर शोध घेणे (Ground Search):**शोध घ्यावयाचे क्षेत्र (Area) **३० फूट × ३० फूट (30' x 30')**चे असेल.शोधकार्यासाठी स्फोटके असलेली केवळ दोन पाकिटे (Packets) वापरली जातील. ही पाकिटे दोन वेगवेगळ्या खड्ड्यांमध्ये किमान ३ इंच आणि कमाल ६ इंच खोलीवर पुरली जातील.शोध घ्यावयाचे क्षेत्र लाल झेंड्यांनी चिन्हांकित केले जाईल आणि ते हँडलरला दाखवले जाईल. हँडलर श्वानाला हार्नेस (पट्टा) लावेल आणि पंचानी जमिनीजवळ दाखवलेल्या जागेवर उभा राहील. पंचांकडून आदेश मिळाल्यानंतर, तो आपल्या श्वानाला 'गो फाइंड' (Go find - शोधून काढ) असा आदेश देईल. वस्तू शोधल्यानंतर, श्वानाने तिथे**बसून (Sitting) किंवा भुंकून (Barking)**तसा संकेत दिला पाहिजे. शोध घेण्यासाठी कमाल १५ मिनिटांचा वेळ दिला जाईल.

४. **वाहनांची झडती घेणे (**Vehicle Search): स्फोटकासाठीच्या वाहन तपासणी इव्हेंटदरम्यान, शोधण्यासाठी किमान दोन वस्तू (स्फोटके) लपवलेल्या असाव्यात. वस्तू लपवण्यासाठी बस, ट्रक, ट्रॅक्टर, हलकी वाहने (कार/जीप) आणि दुचाकींचा वापर केला जाऊ शकतो. बस, ट्रक, जीप आणि कारच्या बाबतीत, तपासणीसाठी एकच वाहन ठेवले जाईल. जर दुचाकी वाहनांची झडती घ्यायची असेल, तर किमान ५ दुचाकी वाहने वापरली जावीत.

५. वाहनांच्या तपासणीदरम्यान, श्वान सर्वप्रथम वाहनाच्या बाहेरील बाजूचा शोध घेईल आणि बाहेर काहीही लपवलेले नाही याची खात्री पटल्यानंतरच, श्वान वाहनाच्या आत प्रवेश करून आतील बाजूचा शोध घेईल. हे करत असताना हँडलर वाहनाच्या खिडक्यांशी कोणतीही छेडछाड (किंवा फेरबदल) करणार नाही. शोध घेण्यासाठी अनुज्ञेय असलेला कमाल वेळ खालीलप्रमाणे आहे:
जड वाहनासाठी (Heavy vehicle): १५ मिनिटे
हलक्या वाहनासाठी (Light vehicle): १० मिनिटे
दुचाकी वाहनासाठी (Two-wheeler): ५ मिनिटे

६. **इमारतीमध्ये शोध घेणे** (Building search): यासाठी २ ते ३ खोल्यांचे घर असलेले क्षेत्र वापरले जाईल. यामध्ये दोन वस्तू (स्फोटके) लपवल्या जातील. लपवलेल्या वस्तू श्वानाच्या पोहोचण्याच्या पलीकडच्या ठिकाणी नसाव्यात. जर वस्तू उंचीवर लपवायच्या असतील, तर त्या ५ फुटांपेक्षा जास्त उंचीवर ठेवल्या जाऊ नयेत. शोध घ्यायच्या खोलीत दैनंदिन जीवनात घर किंवा कार्यालयात सामान्यतः ठेवल्या जाणाऱ्या वस्तू असाव्यात, याला प्राधान्य दिले जाईल. शोध घेण्यासाठी एकूण वेळप्रति खोली १० मिनिटेअसेल.

७. **मानवी शरीराची झडती घेणे** (Human Body Search): या कसरतीसाठी किमान १० व्यक्तींचा वापर केला जाईल. या व्यक्तींपैकी केवळ एकाच व्यक्तीकडे वस्तू (स्फोटक) दिली जाईल. त्या व्यक्ती एकमेकांपासून ३ फूट अंतरावर एका ओळीत उभ्या राहतील आणि पंचांकडून 'गो' (Go) चा संकेत मिळताच श्वान एकेका व्यक्तीचा वास (Sniff) घेईल आणि ज्या व्यक्तीकडे ती वस्तू असेल, त्याच्यासमोरबसून किंवा भुंकूनत्याचा संकेत देईल. शोध घेण्यासाठी कमाल वेळ १० मिनिटे असेल.

८. **सामानाची झडती घेणे** (Luggage Search): सामानासाठी सुटकेस, अंथरूण (Bedding), कुंडी (Flowerpot), हँडबॅग, पुठ्ठ्याचे बॉक्स (Cartons) आणि यांसारख्या इतर वस्तू वापरल्या जाऊ शकतात. सामान म्हणून अशा कमाल १० वस्तू वापरल्या जाऊ शकतात. तथापि, स्फोटक वस्तू केवळ दोनच सामानांमध्ये लपवली जाऊ शकते. सामानाचा प्रत्येक तुकडा एकमेकांपासून एक फूट अंतरावर ठेवला जावा. शोध घेण्यासाठी कमाल वेळ १० मिनिटे असेल.

## एक्सप्लोसिव्ह / स्फोटक चाचणी गुणदान पद्धत –:

| **अ. क्र.** | **चाचणी** | **गुण** |
|---|---|---|
| १) | आज्ञापालन चाचणी | २५ गुण |
| २) | अन्न नकार | २५ गुण |
| ३) | इमारतीमध्ये शोध घेणे | ७५ गुण |
| ४) | जमिनीवर शोध घेणे | १०० गुण |
| ५) | वाहनांची झडती घेणे | ७५ गुण |
| ६) | सामानाची झडती घेणे | ६० गुण |
| ७) | मानवी शरीराची झडती घेणे | ४० गुण |
| | **एकूण** | **४०० गुण** |

**स्फोटक चाचणीसाठी मुख्य पंचांकरीता महत्त्वाच्या नोंदी :**

१. स्फोटकांच्या शोधादरम्यान, श्वानाने नेहमी हँडलरच्या पुढे राहावे आणि पुढे सरकावे. शिवाय, सर्व शोध मोहिमा या एकतर पट्ट्याशिवाय (Free leash) केल्या जाव्यात किंवा श्वान पट्ट्यासह (Leash) कामगिरी करत असल्यास, पट्टा सैल असावा आणि हँडलर श्वानापासून किमान ३ ते ४ फूट मागे असावा जेणेकरून श्वानाला मुक्तपणे कामगिरी करता येईल.

२. स्फोटक शोधण्याच्या इव्हेंटमधील चाचण्यांमध्ये प्रत्येक अतिरिक्त आदेशासाठी (Extra command) गुण वजा केले जावेत. आजकालच्या स्फोटक घटनांचे गांभीर्य आणि तीव्रता लक्षात घेता, जर श्वान आणि त्याचा हँडलर वाहनाची बाहेरील बाजू पूर्णपणे तपासण्यापूर्वीच वाहनाच्या आत प्रवेश करत असतील, तर १० गुणांचा दंड (Penalty) आकारला जाईल.

३. 'गो' (Go - जा) हा शाब्दिक आदेश मिळताच श्वानाने स्वतःच्या इच्छेने हँडलरच्या पुढे गेले पाहिजे.

४. स्फोटक शोधून काढल्यावर, श्वानाने त्या वस्तूच्या (स्फोटकाच्या) जागेपासून ६० सेंटी मीटरच्या (60 cms.) आत स्फोटकाकडे तोंड करून **बसले पाहिजे (Sit)**आणि बसून किंवा भुंकून तसा संकेत दिला पाहिजे.

५. वस्तूची चुकीची माहिती किंवा चुकीचा संकेत दिल्यास (Wrong indication) **१० गुण वजा (दंड)**केले जातील.

६. वस्तूच्या सभोवतालच्या परिसरात तिचा गंध (वास) पसरण्यासाठी, प्रत्येक शोधमोहीम सुरू होण्याच्या **किमान एक तास आधी** स्फोटक वस्तू लपवून ठेवली जाईल.

७. लपवलेल्या वस्तूच्या जागेकडे श्वानाला घेऊन जाण्याचा हँडलरचा कोणताही प्रयत्न आढळल्यास, नकारात्मक गुणदान (Negative marking) करून **५ गुणांचा दंड** आकारला जाईल.

८. गुण देताना पंच हँडलरच्या वर्तनाचा/दृष्टिकोनाचा (Attitude) देखील विचार करतील. हँडलरच्या खालील कृतींची नोंद घेतली जाईल आणि त्यानुसार गुण दिले जातील; जसे की - हँडलरचे वर्तन, हँडलरने वाऱ्याच्या दिशेचा घेतलेला अचूक अंदाज, श्वानाच्या हालचालींवर टाकलेला प्रभाव आणि श्वानाला नियंत्रित करण्यासाठी केलेली कारवाई.

९. वाहनांच्या बाबतीत, जर श्वान आणि त्याचा हँडलर बाहेरील बाजू पूर्णपणे तपासण्यापूर्वीच आत जात असतील, तर **१० गुणांचा दंड** आकारला जाईल.

१०. पुढील प्रदर्शकासाठी (Exhibitor) जर वस्तू बदलायच्या असतील, तर त्यासोबतच जमीन, वाहन किंवा खोली देखील बदलली पाहिजे; कारण जिथे आधी वस्तू लपवल्या होत्या तिथे गंधाचे अंश शिल्लक राहतात आणि श्वान तिथे पुन्हा संकेत देऊ शकतो.

११. माणसांच्या झडती (Man search) च्या बाबतीत, वस्तू लपवणाऱ्या व्यक्ती प्राधान्याने बदलल्या पाहिजेत; परंतु त्या नवीन व्यक्तीकडे स्पर्धा सुरू होण्याच्या किमान एक तास आधीपासून ती वस्तू असणे आवश्यक आहे. चाचणी सुरू करण्यापूर्वी किमान ५ व्यक्तींना वस्तूसह तयार ठेवणे सोयीचे ठरेल, जेणेकरून त्यांना सहज बदलता येऊ शकेल.

## ३. अंमली पदार्थ शोधक चाचणी आयोजित करण्यासाठी मार्गदर्शक सूचना:

या चाचणीसाठी कोकेन (Cocaine), चरस (Charas), अफीम (Opium), मॉर्फिन (Morphine), एलएसडी (LSD), ब्राऊन शुगर (Brown sugar), हेरॉईन (Heroin) किंवा तत्सम प्रकारचे अंमली पदार्थ (Psychotropic drugs) वापरले जातील. अंमली पदार्थांचे किमान प्रमाण १०० ग्रॅम असावे.

**१. आज्ञापालन चाचणी (Obedience Test):**यामध्ये 'हील फ्री' (पट्ट्याशिवाय सोबत चालणे), 'सिट' (बसणे), 'अप' (उठणे) आणि 'कम' (जवळ येणे) यांचा समावेश असेल. श्वानाने नेहमी हँडलरच्या डाव्या बाजूने चालले

पाहिजे. 'हील फ्री' मध्ये डावीकडे वळणे, उजवीकडे वळणे तसेच वेगवान, मध्यम आणि संथ गतीने चालणे या बाबी पूर्ण कराव्या लागतील. श्वान मागे रेंगाळल्यास किंवा हँडलरच्या पुढे निघून गेल्यास ५ गुण वजा (दंड) केले जातील. थांबण्याच्या प्रत्येक आदेशावर श्वान स्वतःहून बसेल. 'सिट', 'अप' आणि 'कम' या प्रत्येक कृतीसाठी केवळ एकच शाब्दिक आदेश दिला जाईल. हँडलरने दिलेल्या प्रत्येक अतिरिक्त आदेशासाठी किंवा संकेतासाठी (सिग्नल) ५ गुण वजा केले जातील.

२. **अनोळखी व्यक्तींकडून अन्न नाकारणे (Refusing Food from Strangers):**ही कसरत चाचणीदरम्यान कोणत्याही वेळी केली जाऊ शकते. श्वानाला आकर्षित करेल असे कच्चे मांस, यकृत (Liver), बिस्किट किंवा इतर कोणत्याही वस्तूचा वापर करून परीक्षा घेतली जाऊ शकते. यासाठी वाडग्यातील पाण्याचा देखील वापर केला जाऊ शकतो.

३. **इमारतीमध्ये शोध घेणे (Building Search):**यासाठी २ ते ३ खोल्यांचे घर असलेले क्षेत्र वापरले जाईल. यामध्ये दोन वस्तू (अंमली पदार्थ) लपवल्या जातील. लपवलेल्या वस्तू श्वानाच्या पोहोचण्याच्या पलीकडच्या ठिकाणी नसाव्यात. जर वस्तू उंचीवर लपवायच्या असतील, तर त्या ५ फुटांपेक्षा जास्त उंचीवर ठेवल्या जाऊ नयेत. शोध घ्यायच्या खोलीत दैनंदिन जीवनात घर किंवा कार्यालयात सामान्यतः ठेवल्या जाणाऱ्या वस्तू असाव्यात, याला प्राधान्य दिले जाईल. शोध घेण्यासाठी कमाल वेळ **प्रति खोली १० मिनिटे** असेल.

४. **वाहनांची झडती घेणे (Vehicle Search):**वस्तू (अंमली पदार्थ) लपवण्यासाठी बस, ट्रक, ट्रॅक्टर, हलकी वाहने (कार/जीप) आणि दुचाकींचा वापर केला जाऊ शकतो. बस आणि ट्रकच्या बाबतीत, तपासणीसाठी एकच वाहन ठेवले जाईल. जर दुचाकी वाहनांची झडती घ्यायची असेल, तर किमान ५ दुचाकी वाहने वापरली जावीत. तपासणी दरम्यान, श्वान सर्वप्रथम वाहनाच्या बाहेरील बाजूचा शोध घेईल आणि बाहेर काहीही लपवलेले नाही याची खात्री पटल्यानंतरच, श्वान वाहनाच्या आत प्रवेश करून आतील बाजूचा शोध घेईल. शोध घेण्यासाठी अनुज्ञेय असलेला कमाल वेळ खालीलप्रमाणे आहे:
**जड वाहनासाठी (Heavy vehicle): -** १५ मिनिटे
**हलक्या वाहनासाठी (Light vehicle): -** १० मिनिटे
**दुचाकी वाहनासाठी (Two-wheeler): -** ५ मिनिटे

५. **सामानाची झडती घेणे (Luggage Search):** सामानासाठी सुटकेस, अंथरूण (Bedding), हँडबॅग, पुठ्ठ्याचे बॉक्स (Cartons) आणि यांसारख्या इतर वस्तू वापरल्या जाऊ शकतात. सामान म्हणून अशा कमाल १० वस्तू वापरल्या जाऊ शकतात. तथापि, अंमली पदार्थ केवळ दोनच सामानांमध्ये लपवले जाऊ शकतात. शोध घेण्यासाठी कमाल वेळ १० मिनिटे असेल.

६. **जमिनीवर शोध घेणे (Ground search):** (अ) शोध घ्यावयाचे क्षेत्र **३० फूट × ३० फूट (30' x 30')**चे असेल. (ब) शोधकार्यासाठी अंमली पदार्थ असलेली केवळ दोन पाकिटे वापरली जातील. ही पाकिटे किमान ३ इंच आणि कमाल ६ इंच खोलीवर पुरली जातील. शोध घ्यावयाचे क्षेत्र लाल झेंड्यांनी चिन्हांकित केले जाईल आणि ते हँडलरला दाखवले जाईल. हँडलर श्वानाला हार्नेस (पट्टा) लावेल आणि पंचांनी जमिनीजवळ दाखवलेल्या जागेवर उभा राहील. पंचांकडून आदेश मिळाल्यानंतर, तो आपल्या श्वानाला 'गो फाइंड' (Go find - शोधून काढ) असा आदेश देईल. वस्तू शोधल्यानंतर, श्वानाने तिथे **बसून (Sitting), भुंकून (Barking), पंजा मारून (Pawing) किंवा तोंड लावून (Mouthing)**तसा संकेत दिला पाहिजे. शोध घेण्यासाठी कमाल १५ मिनिटांचा वेळ दिला जाईल.

७. **मानवी शरीराची झडती घेणे (Human Body Search):**या कसरतीसाठी किमान १० व्यक्तींचा वापर केला जाईल. या व्यक्तींपैकी केवळ एकाच व्यक्तीकडे अंमली पदार्थ दिला जाईल. त्या व्यक्ती एकमेकांपासून ३ फूट अंतरावर कोणत्याही रचनेत उभ्या राहतील आणि पंचांकडून 'गो' (Go) चा संकेत मिळताच श्वान एकेका व्यक्तीचा

वास (Sniff) घेईल आणि ज्या व्यक्तीकडे तो पदार्थ असेल, त्याच्यासमोर**बसून, भुंकून, तोंड लावून किंवा पंजा मारून** त्याचा संकेत देईल. शोध घेण्यासाठी कमाल वेळ १० मिनिटे असेल.

- **अंमली पदार्थ चाचणी गुणदान पद्धत –**

| अ. क्र. | चाचणी | गुण |
|---|---|---|
| १) | आज्ञापालन चाचणी | २५ गुण |
| २) | अन्न नकार | २५ गुण |
| ३) | इमारतीमध्ये शोध घेणे | ७५ गुण |
| ४) | जमिनीवर शोध घेणे | ७५ गुण |
| ५) | वाहनांची झडती घेणे | ७५ गुण |
| ६) | सामानाची झडती घेणे | ७५ गुण |
| ७) | मानवी शरीराची झडती घेणे | ५० गुण |
| **एकूण** | | **४०० गुण** |

**अंमली पदार्थ चाचणीसाठी परिक्षकांकरिता महत्त्वाच्या नोंदी:**

१. 'गो' (Go) हा शाब्दिक आदेश मिळताच श्वानाने स्वतःच्या इच्छेने हँडलरच्या पुढे गेले पाहिजे.
२. अंमली पदार्थ शोधून काढल्यावर, श्वानाने **बसून, भुंकून, तोंड लावून किंवा पंजा मारून** त्याचा संकेत दिला पाहिजे.
३. वस्तूची चुकीची माहिती किंवा चुकीचा संकेत दिल्यास (Wrong indication) **१० गुण वजा (दंड)**केले जातील.
४. वस्तूच्या सभोवतालच्या परिसरात तिचा गंध (वास) पसरण्यासाठी, प्रत्येक शोधमोहीम सुरू होण्याच्या **किमान एक तास आधी** अंमली पदार्थ लपवून ठेवले जातील.
५. लपवलेल्या वस्तूच्या जागेकडे श्वानाला घेऊन जाण्याचा हँडलरचा कोणताही प्रयत्न आढळल्यास, नकारात्मक गुणदान (Negative marking) करून **५ गुणांचा दंड** आकारला जाईल.
६. गुण देताना पंच हँडलरच्या वर्तनाचा/दृष्टिकोनाचा (Attitude) देखील विचार करतील. हँडलरच्या खालील कृतींची नोंद घेतली जाईल आणि त्यानुसार गुण दिले जातील; जसे की - हँडलरचे वर्तन, हँडलरने वाऱ्याच्या दिशेचा घेतलेला अचूक अंदाज, श्वानाच्या हालचालींवर टाकलेला प्रभाव आणि श्वानाला नियंत्रित करण्यासाठी केलेली कारवाई.
७. वाहनांच्या बाबतीत, जर हँडलर वाहनाची बाहेरील बाजू पूर्णपणे तपासण्यापूर्वीच (तिचा शोध न घेता) आत प्रवेश करत असेल, तर या कृतीसाठी नकारात्मक गुणदान केले जाईल आणि **५ गुण वजा** केले जातील.
८. पुढील प्रदर्शकासाठी (Exhibitor) जर वस्तू (अंमली पदार्थ) बदलायच्या असतील, तर त्यासोबतच जमीन, वाहन किंवा खोली देखील बदलली पाहिजे; कारण जिथे आधी वस्तू लपवल्या होत्या तिथे गंधाचे अंश (Traces of scent) शिल्लक राहतात आणि श्वान तिथे पुन्हा संकेत देईल.
९. माणसांच्या झडती (Man search) च्या बाबतीत, वस्तू (अंमली पदार्थ) लपवणाऱ्या व्यक्ती प्राधान्याने बदलल्या पाहिजेत; परंतु त्या नवीन व्यक्तीकडे स्पर्धा सुरू होण्याच्या किमान एक तास आधीपासून ती वस्तू असणे आवश्यक आहे. चाचणी सुरू करण्यापूर्वी किमान ५ व्यक्तींना वस्तूसह तयार ठेवणे सोयीचे ठरेल, जेणेकरून त्यांना सहज बदलता येऊ शकेल.

१०. अंमली पदार्थ शोधण्याच्या (Narcotics search) इव्हेंटमधील चाचण्यांमध्ये प्रत्येक अतिरिक्त आदेशासाठी (Extra command) गुण वजा केले जावेत.

- **स्फोटक आणि अंमली पदार्थ शोधासाठी दिलेला वेळ**

स्फोटक (Explosive) आणि अंमली पदार्थ (Narcotic) या दोन्ही शोध मोहिमांमध्ये, या इव्हेंटसाठी ठरवून दिलेल्या वेळेची पूर्ण वाट न पाहता, श्वानाने लपवलेली वस्तू शोधल्याचा संकेत देताच श्वान हँडलरने **त्वरित मुख्य पंचांना अहवाल (Report) देणे बंधनकारक असेल.**

- **पदके / चषक:**

**१. वैयक्तिक पदके आणि प्रमाणपत्रे (Individual Medals and Certificates)**

प्रत्येक ट्रेडमध्ये (शाखेत) जात किंवा लिंगाचा विचार न करता अनुक्रमे प्रथम, द्वितीय आणि तृतीय स्थान मिळवणाऱ्या **श्वानांना** वैयक्तिक पदके आणि प्रमाणपत्रे दिली जातील. संबंधित ट्रेडमध्ये मिळवलेल्या एकूण गुणांच्या आधारे क्रमवारी/ स्थान निश्चित केले जाईल.

**२. इव्हेंट श्रेणी नुसार विशेष पदके -**

| प्रवर्ग / ट्रेड | इव्हेंट/ स्पर्धा | मेडल |
|---|---|---|
| **आज्ञा पालन व अन्न नाकारणे** | **सर्व ट्रेडस मधील एकत्रीत कामगीरी** | **१ सुवर्ण ,१ रौप्य , १ कांस्य पदक** |
| **ट्रॅकर डॉग / माग काढणारा श्वान** | **१. अडथळयांवरुन वस्तु परत आणणे.<br>२. शोधणे. दोन<br>३. गंधातील फरक ओळखणे.<br>४. गंध ओळखणे.<br>५. माग काढणे.** | **१ सुवर्ण , १ रौप्य , १ कांस्य पदक** |
| **स्फोटक शोधक श्वान** | **१. इमारतीमध्ये शोध घेणे.<br>२. जमीनीवर शोध घेणे.<br>३. वाहनांची झडती घेणे.<br>४. सामानाची झडती घेणे .<br>५. मानवी शरीराची झडती घेणे.** | **१ सुवर्ण , १ रौप्य , १ कांस्य पदक** |
| **अंमली पदार्थ शोधक श्वान** | **१. जमीनीवर शोध घेणे.<br>२. वाहनांची झडती घेणे.<br>३. इमारतीमध्ये शोध घेणे .<br>४. सामानाची झडती घेणे .<br>५. मानवी शरीराची झडती घेणे .** | **१ सुवर्ण , १ रौप्य , १ कांस्य पदक** |

**टिप – श्वान स्पर्धेतील वरील इव्हेंट श्रेणीनुसार देण्यात येणा-या विशेष पदकांचे गुण कोणत्याही चषकाकरिता गृहीत धरले जाणार नाही.**

**३. सांघिक पुरस्कार (Team Awards)**

टीम चॅम्पियनशिप चषक आणि प्रमाणपत्र (Team Championship Trophy and Certificate) प्रत्येक ट्रेड चाचणीत मिळवलेल्या सरासरी गुणांच्या बेरजेच्या आधारे सर्वोत्तम ठरलेल्या संघाला प्रदान केले जाईल.

**४. सर्वोत्कृष्ट श्वान पुरस्कार** –

तीनही ट्रेड टेस्टमध्ये मिळुन सर्वाधिक गुण मिळवणा-या श्वानाला हा पुरस्कार दिला जाईल.

गुण:-

- प्रत्येक श्वानाच्या कामगिरीचे मुल्यमापन गुणांवर केले जाईल. (४00 गुण)
- प्रत्येक इव्हेंट/ स्पर्धेत मिळालेले गुण हे स्पर्धा संपल्यानंतर लगेचच जाहीर केले जावे. ट्रेड टेस्ट पुर्ण झाल्यानंतर निकाल त्वरीत घोषित केले जावे.

# श्वान स्पर्धा
## (प्रवेश अर्ज)

१. संघाचेनाव :________________________________________________________________

२. संघाचे प्रभारी अधिकारी यांचे नाव: ____________________________________________

३. श्वानपथक अधिकाऱ्याचे नाव:____________________________________________________

| अ.नं. | श्वानाचे नाव | लिंग | श्वानाची जन्म तारीख | श्वानाचा वंश / जात | रंग ओळखण्याची खूण | नोंदणी प्रमाणपत्र क्रमांक व भारतातील श्वान घरातील पान क्र. व तारीख किंवा ज्या देशातून आयात केला त्या देशाचे नाव | श्वानाचे वंशावळीची कागदपत्रे सोबत जोडली आहेत अगर कसे? | श्वान हस्तकाचे नाव व पदनाम |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | | | | | | | | |
| २ | | | | | | | | |
| ३ | | | | | | | | |
| ४ | | | | | | | | |
| ५ | | | | | | | | |
| ६ | | | | | | | | |
| ७ | | | | | | | | |
| ८ | | | | | | | | |
| ९ | | | | | | | | |

**प्रमाणित करण्यात येते की :**

१. १८ महिन्यांपेक्षा कमी वय असलेल्या कोणत्याही श्वानाला किंवा ऋतूचक्रात (In season) असलेल्या अथवा ३३ दिवसांपेक्षा जास्त काळाची गर्भधारणा असलेल्या कोणत्याही मादीला स्पर्धेत समाविष्ट करण्यात आलेले नाही.

२. या स्पर्धेत समाविष्ट केलेला कोणताही श्वान पूर्णपणे आंधळा नाही, ऐकण्यात दोष असलेला नाही,

३. 'केनेल क्लब ऑफ इंडिया'चे वंशावळ प्रमाणपत्र (Pedigree papers) आणि नोंदणी प्रमाणपत्र (पान क्रमांक ___वर दिल्याप्रमाणे) किंवा ज्या देशातून श्वान आयात केला आहे त्या देशाचे प्रमाणपत्र, स्पर्धा सुरू होण्यापूर्वी जजच्या मागणीनुसार सादर केले जाईल.

४. हँडलर्स आणि इतरांचे प्रवेश शुल्क महाराष्ट्र पोलीस कर्तव्य मेळाव्याच्या फंडात जमा करण्यात आले आहे.

५. वरीलपैकी कोणत्याही श्वानाने किंवा त्याच्या हँडलरने मागील १ वर्षाच्या अखिल भारतीय पोलीस कर्तव्य मेळाव्यातील स्पर्धेत प्रथम, द्वितीय किंवा तृतीय स्थान मिळवलेले नाही.

**सही**

**पो. आयुक्त/ विपोमनि.**

# परिशिष्ट-१

## महाराष्ट्र राज्य पोलीस कर्तव्य मेळाव्यामध्ये दिल्या जाणाऱ्या चषकांची यादी

| अ. क्र. | स्पर्धा | चषक |
|---|---|---|
| १. | सायंटीफिक एड टु इन्वेस्टीगेशन | Best Team Performance in Scientific Aid to Investigation |
| २. | पोलीस फोटोग्राफी | Best Team Performance in Police Photography |
| ३. | पोलीस व्हिडीओग्राफी | Best Team Performance in Videography Competition |
| ४. | इनफॉरमेशन टेक्नॉलॉजी प्रोफिशियन्सी | Best Team Performance in IT Proficiency Competition |
| ५. | ॲन्टी सॅबोटेज चेक स्पर्धा | Best Team Performance in Anti-Sabotage Check Competition |
| | | Shri. A.M. Kamthe Trophy |
| ६. | श्वान स्पर्धा | Best Team Performance in Dog Squad Competition |
| | | Best Dog |
| ७. | स्पर्धेत सर्वात जास्त पदके मिळविणाऱ्या संघास | General Championship Trophy |
| ८. | जनरल चॅम्पिअनशीप ट्रॉफी मिळविणाऱ्या संघास | CID Centenary Trophy |
| ९. | पदक तालिकेतील दुसऱ्या क्रमांकाच्या संघास | Runner Up Trophy |

# परिशिष्ट-२

## महाराष्ट्र राज्य पोलीस कर्तव्य मळाव्यामध्ये दिल्या जाणाऱ्या पदकांची यादी.

| अ.नं. | संघसदस्य | उप-प्रकार | पदके | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | सुवर्ण | रजत | कांस्य |
| १. | Scientific aid to investigation - Competition | १. Forensic Science Written Test | १ | १ | १ |
| | | २. Finger Prints Test | १ | १ | १ |
| | | ३. Crime Investigation, Criminal Laws, Rules, Procedures & Court Judgements | १ | १ | १ |
| | | ४. Labelling & Packing Test | १ | १ | १ |
| | | ५. Medico – Legal (Oral) | १ | १ | १ |
| | | ६. Photography Test | १ | १ | १ |
| | | ७. Observation Test | १ | १ | १ |
| | | ८. Police Portrait Test | १ | १ | १ |
| २. | Police Photography Competition | - | १ | १ | १ |
| ३. | Police Videography Competition | - | १ | १ | १ |
| ४. | Antisabotage Check Competition | १. Room Search | १ | १ | १ |
| | | २. Ground Search | १ | १ | १ |
| | | ३. Vehicle Search | १ | १ | १ |
| | | ४. Access Control | १ | १ | १ |
| ५. | IT Proficiency Competition | १. EVENT I | १ | १ | १ |
| | | २. EVENT II | २ | २ | २ |
| | | ३. EVENT III | २ | २ | २ |
| ६. | Dog Squad Competition | १. Tracking | १ | १ | १ |
| | | २. Explosives | १ | १ | १ |
| | | ३. Narcotics | १ | १ | १ |
| एकूण पदके | | | २२ | २२ | २२ |

# परिशिष्ट-३

## महाराष्ट्र राज्य पोलीस कर्तव्य मेळावा आयोजित करणेकामीप्र थमत:आयोजन समिती गठित करण्यात येते.

| Sr.No. | NAME | OFFICE NO. | MOBILE NO. |
|---|---|---|---|
| 1 | Chairman :<br>DGP, M.S., Mumbai | | |
| 2 | Co-Chairman:<br>ADG, CID, M.S., Pune | | |
| 3 | CP, Pune City | | |
| 4 | ADG (Admin), M.S., Mumbai | | |
| 5 | ADG (Wireless), M.S., Pune | | |
| 6 | CP, Pimpari Chinchwad | | |
| 7 | ADG, SRPF, M.S., Mumbai | | |
| 8 | Spl.IGP (Admin), M.S., Mumbal | | |
| 9 | Spl.IGP, SCRB, CID, M.S., Pune | | |
| 10 | Spl.IGP & Director, M.I.A., Pune<br>Addl. Charge Spl.IGP, SRPF, Pune | | |

वरील आयोजन समितीचे अध्यक्षतेखाली, महाराष्ट्र राज्य पोलीस कर्तव्य मेळाव्याचे आयोजन यजमान पद हे ज्या पोलीस आयुक्तालय / परिक्षेत्र यांचेकडे असेल त्या घटकांचे अधिकारी / अंमलदार यांचे सहभागाने खालील कामकाज समित्यांचे गठण करण्यात येईल. या सर्व समित्यांचे प्रमुख म्हणून पोलीस उप महानिरिक्षक अथवा पोलीस अधीक्षक दर्जाचे अधिकारी काम पहातील. तसेच या समितीचे कामकाजासाठी करण्यात येणारा पत्र व्यवहारासाठी व समितीसाठी लागणाऱ्या खर्चाचा ताळेबंद ठेवणेसाठी, गुन्हे अन्वेषण विभाग पुणे यांचे कडील पोलीस उप अधीक्षक / पोलीस निरिक्षक दर्जाचे एक अधिकारी यांची नेमणुक प्रत्येक समितीचे सदस्य म्हणून करण्यात येईल.

आयोजन समिती मार्फत खालील ११ समित्यांचे गठण हे महाराष्ट्र राज्य पोलीस आयोजन कामी करण्यात येते.

१. स्वागत समिती
२. निवास व्यवस्था व दळणवळण समिती
३. मैदान व्यवस्था समिती.
४. उदघाटन व समारोप समिती
५. बक्षिस व प्रमाणपत्र समिती
६. भोजन व मनोरंजनस समिती
७. लेखा व प्रशासन समिती
८. अपील व निकाल समिती
९. प्रसार माध्यमे समिती
१०. स्पर्धा आयोजन समिती
११. वैद्यकीय व प्रथमोपचार समिती

तसेच स्पर्धा आयोजन समितीकरिता सहा स्पर्धा समित्या गठीत करण्यात येतील. नमुद स्पर्धा समितीचे प्रमुख म्हणून गुन्हे अन्वेषण विभाग, म.रा., पुणे यांचे कडील पोलीस अधीक्षक दर्जाचे अधिकारी काम पहातील. सदर समित्यांमध्ये संबंधित विषयाचे तज्ञ शासकीय अधिकारी यांची सदस्य म्हणून नेमणुक करण्यात येईल. प्रत्येक समितीमध्ये गुन्हे अन्वेषण विभाग पुणे कडील पोलीस अधिकारी व अंमलदार यांची नेमणुक करण्यात येईल.

**धन्यवाद ... !!**